(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव परिसरातील शहिदांच्या पत्नींची मुंबईत घर देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

(1) * 42885 श्री. विजय गिरकर : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शहिदांच्या कुटुंबीयांसाठी म्हाडामार्फत काढण्यात येणाऱ्या घरांच्या लॉटरीमध्ये काही घरे राखीव ठेवण्यात येत असल्यामुळे सातारा जिल्ह्यातील कोरेगाव परिसरातील शहिदांच्या पत्नींना सन 2008 ते सन 2010 च्या लॉटरीत मुंबईत घरे देण्याचे आमिष दाखवून दलालांनी त्यांच्या नावे मालाड, दहिसर, प्रतिक्षानगर, गोरेगांव येथील घरांसाठी अर्ज भरले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या लॉटरीत बहुतांश शहिदांच्या कुटुंबीयांना घरे लागल्यामुळे दलालांनी शहिदांच्या पत्नीकडून कागदपत्रे व सह्या घेऊन त्यांना घर मिळाले की कळवितो, असे सांगून त्यांना मिळालेल्या घरांची परस्पर विक्री केली, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, पाच वर्षानंतर ही घरे खरेदीदाराच्या नावावर होतील असे आश्वासन दलालांनी घर खरेदीदारांना दिल्यामुळे घर खरेदीदारांनी घरांचा मेटेनन्स भरला नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, गृहनिर्माण सोसायटीने दिलेल्या थकबाकीच्या नोटीसा घर मालकांना पाठविल्यामुळे हा घोटाळा निदर्शनास येऊनही अद्यापपर्यंत म्हाडाने या दलालांवर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1), (2), (3), (4) व (5) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे शहीद जवानांच्या विधवा पत्नी यांना फसविल्याबाबतचे पत्र दि.1 फेब्रुवारी, 2012 रोजी मिळाले होते. सदरहू पत्रातील तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडाच्या दक्षता व सुरक्षा विभागामार्फत चौकशी करण्यात येऊन संबंधितांविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशनमध्ये दि.21.6.2012 रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती.

सदरहू तक्रारींच्या अनुषंगाने खेरवाडी पोलीस ठाणे यांनी केलेल्या चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याचे दि.11.4.2013 च्या पत्रान्वये कळविले आहे.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने सुधारणा करावयाची आहे. उत्तराच्या शेवटच्या ओळी नंतर "तथापि, म्हाडाच्या दक्षता पथकास स्थळ पाहणीत व चौकशीत 8 सदनिकांमध्ये मूळ लाभार्थींचे वास्तव नसल्याचे आढळून आल्याने म्हाडा अधिनियमान्वये निष्कासनाची कारवाई सुरू करण्यात आली आहे." असे वाचावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर :सभापती महोदय, मी म्हाडाचे दुसरे प्रकरण मांडलेले आहे. त्यामुळे आपण मला संरक्षण द्यावे. मी दिनांक 18.4.2013 रोजी म्हाडातील एका प्रकरणा संबंधात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मला माननीय मुख्यमंत्र्यांनी चौकशी करून कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिले होते. या प्रकरणा संबंधात अद्यापि कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. मी आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना पुन्हा विनंती करतो की, या प्रकरणाची आपण पुन्हा चौकशी करावी. या प्रकरणात रूपये 10.00 कोटी इतक्या रकमेचा भ्रष्टाचार झालेला आहे.

आता मी येथे जो तारांकित प्रश्न प्रश्न विचारला आहे त्याला शासनातर्फे "सदरहू तक्रार खेरवाडी पोलीस ठाण्याकडे दिली असून त्यांच्या चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याने प्रश्न उद्भवत नाही" अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. आता शासन सुधारित उत्तरामध्ये सांगत आहे की, 8 सदनिकांमध्ये मूळ लाभार्थी रहात नसल्यामुळे निष्कासनाची कारवाई सुरू आहे. शहिदांच्या पत्नींना दिलेल्या सदनिकांमध्ये आणि लॉटरीमध्ये लागलेल्या सदनिकांमध्ये घोटाळा होतो. आज म्हाडाचा कारभार कोण चालवत आहे ? आज म्हाडातील कारभार दलाल चालवत आहेत अशा प्रकारच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रात येत आहेत. मी तीन महिन्यापूर्वी हा प्रश्न विचारला होता. त्याला येथे देण्यात आलेले उत्तर बरोबर नाही. तेव्हा या संबंधी शासन कोणती कारवाई करणार आहे, तसेच शासन म्हाडातील दलालांचा कायमचा बंदोबस्त करणार आहे काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, निष्कासनाची कारवाई येत्या एक महिन्यामध्ये केली जाईल आणि संबंधित दलाला विरूद्ध देखील कारवाई केली जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, 8 सदनिकांमध्ये मूळ लाभार्थींचे वास्तव नसल्याचे आढळून आले आहे. प्रश्न क्रमांक 3 ला शानसनाने नाही असे उत्तर दिले आहे. आता शासनाने 8 सदनिकांमध्ये मूळ लाभार्थी नसल्याचे आढळून आले आहे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. या विषयातील पत्र दिनांक 1 फेब्रुवारी 2012 रोजी आलेले आहे. खेरवाडी पोलीस ठाण्यामध्ये दिनांक 21.6.2012 रोजी यासंबंधात तक्रार दाखल करण्यात आली. माझा पहिला प्रश्न आहे की, पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करण्यास चार महिने विलंब का लागलेला आहे ? ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

खेरवाडी पोलीस ठाण्याने ही तक्रार दखलपात्र गुन्हा म्हणून दाखल करून घेतली आहे की, अदखलपात्र गुन्हा म्हणून दाखल केली आहे ? खेरवाडी पोलीस ठाण्याने सदर तक्रार दखलपात्र गुन्हा म्हणून दाखल करून घेतली असल्यास कुठले कलम लावण्यात आले आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपल्याकडे लेखी स्वरूपात तक्रार प्राप्त झाली होती. माझ्याकडे ती तक्रार प्राप्त झाल्यानंतर मी स्वत: बैठक घेतली आणि म्हाडाच्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या की, खेरवाडी पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल करावा. पोलीस स्टेशनला तक्रार दाखल झाल्यानंतर या संबंधातील कारवाई पूर्ण झालेली आहे. एफआयआर दाखल करताना कुठले कलम लावले आहे यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मी यापूर्वी देखील दिनांक 18.4.2013 रोजी एक प्रकरण दिले होते. त्यासंबंधी कारवाई करतो असे आश्वासन देण्यात आले होते. यासंबंधात अद्यापि कुठलीही कारवाई झालेली नाही. यात श्री.देशमुख हा गुन्हेगार असून त्याच्या विरूद्ध एफआयआर देखील दाखल केलेला नाही. यात दहा कोटी रूपयांचा भ्रष्टाचार आहे. तेव्हा मला उत्तर देण्यात आले की, डीआयजी दर्जाचा अधिकारी नेमून चौकशी करण्यात येईल. पण आता पीएसआयची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या तीन महिन्यात काहीच झालेले नाही. या तारांकित प्रश्नाबाबत माननीय राज्यमंत्री महोदय सांगत आहेत की, एक महिन्यात कारवाई करण्यात येईल. शासनाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "खेरवाडी पोलीस ठाणे यांनी केलेल्या चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याने प्रश्नच उद्भवत नाही."

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42885....

श्री. भाई गिरकर....

या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या आल्या होत्या. आम्ही लेखी कळविले होते. असे असताना लेखी उत्तरामध्ये नमूद केलेल आहे की, "खेरवाडी पोलीस ठाणे यांनी केलेल्या चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही" आता माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, एक महिन्यात कारवाई करण्यात येईल. माझा प्रश्न आहे की, यामध्ये किती दलाल दोषी आढळले, त्यापैकी किती दलालांवर कारवाई केलेली आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच उत्तरामध्ये सुधारणा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अगोदर येथे वेगळा प्रश्न मांडला होता त्यावेळी मी उत्तर देताना सांगितले होते की, तीन महिन्यात कार्यवाही करण्यात येईल. जर तीन महिन्यात कार्यवाही झाली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात येईल. कारण सभागृहात आश्वासन दिल्यानंतर त्याबाबत तीन महिन्यांत कार्यवाही झाली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न गृह विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, कारवाई करण्यात येईल. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कारण लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने खेरवाडी पोलीस ठाणे यांनी केलेल्या चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही " तेव्हा आपण नेमकी कोणावर कारवाई करणार हे समजत नाही. अशाप्रकारे शहीद जवानांच्या कुटुंबीयांना फसविण्यात आले आहे असे नसून माजी आमदार श्री.चौधरी यांना देखील फसविण्यात आले आहे. त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देखील करण्यात आलेली आहे. आमच्या "राजयोग" सोसायटीमध्ये श्री.चौधरी यांची सदनिका आहे. परंतु त्या सदनिकेची बनावट कागदपत्रे बनवून ती सदनिका विकण्यात आली. श्री.चौधरी यांचा मुलगा त्यासाठी भांडत आहे आणि ज्याला ती सदनिका विकली तो सदनिका सोडण्यास तयार नाही. त्या संदर्भात मला पत्र लिहावे लागणार आहे. तेव्हा शासन अशा दलालांचा बंदोबस्त कसा करणार आहात ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42885....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माजी आमदारांच्या बाबतीत असे घडले असेल तर ते योग्य नाही. या प्रकरणाची निश्चितपणे दखल घेण्यात येईल. मी सुरुवातीलाच उत्तरामध्ये सुधारणा केलेली आहे की, एफ.आय.आर.रजिस्टर्ड झाल्यानंतर दलालांनी...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दलालांनी बनावट कागदपत्रे बनवून ती सदनिका विकली आहे आणि हे सर्व म्हाडाच्या अधिकाऱ्यांना माहीत आहे. ती सदनिका श्री.चौधरी यांची नाही असे दलाल दाखवित आहे. आपणास म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, राजयोग सोसायटी संबंधी आज प्रश्न नसल्यामुळे त्या संदर्भातील माहिती घेतली नाही. परंतु माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या प्रकरणाची माहिती निश्चितपणे घेतली जाईल.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा येथील शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाच्या कामाबाबत

(2) * 42991 **श्री.पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बुलढाणा येथील शहीद भगतसिंग पुतळ्याचे सौंदर्यीकरणाचे कोणतेही काम न होता 2 लाख रुपये खर्च केल्याचे दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत सन 2009 पासून सातत्याने विधानपरिषद सभागृहात या विषयावर चर्चा होवूनही अद्यापपर्यंत या प्रकरणाची कोणतीही चौकशी शासनाने न करता याबाबत तीच ठराविक उत्तरे देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, दिनांक 17 एप्रिल, 2013 रोजी या विषयावर झालेल्या चर्चेच्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांकडून एक महिन्याच्या आत चौकशी करुन कार्यवाहीसह अहवाल उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन मा.नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, या प्रकरणी शासनास चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(5) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3), (4) व (5) होय. या प्रकरणी शासनाच्या सूचनांनुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी चौकशी करुन उप विभागीय अधिकारी मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार "शहीद भगतसिंग चौकाचे सौंदर्यीकरण करणे व इतर विकास कामे करणे या सदराखाली मंजूर असलेल्या कामापैकी "इतर विकास कामे" या संदर्भातील काम झालेले असून "शहीद भगतसिंग चौकाचे सौंदर्यीकरणाचे काम" झालेले नाही. तसेच शहीद भगतसिंग चौकाचे सौंदर्यीकरण करणे व इतर विकास कामे करणे संदर्भात कंत्राटदाराला दिलेल्या देयकामध्ये "इतर विकास कामाचे" देयक अदा केलेले आहे. "शहीद भगतसिंग चौकाचे सौंदर्यीकरण कामाचे" देयक कंत्राटदाराला अदा केलेले नाही.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42991...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2009 पासून मी हा प्रश्न उपस्थित करीत आहे परंतु मला मूळ प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. भगतसिंग पुतळ्याच्या सौदर्यीकरणाचा हा प्रश्न आहे. या कामास जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता देऊन कामाच्या गुणवत्तेविषयी कार्यान्वीत अधिकारी यांनी खात्री करुन घ्यावी व नंतर कामाच्या मोबदल्याची रक्कम अदा करावी. प्रस्तावित केलेली सर्व कामे मंजूर बांधकाम नकाशामध्ये दर्शविलेल्या जागेवर करावी अशा अटी घालल्या होत्या. जे बिल अदा करण्यात आले त्यास तांत्रिकी मंजुरी घेतलेली नाही. उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की "इतर विकास कामांची देयके अदा करण्यात आली आहेत." मूळ काम हे भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे आहे. त्यामध्ये इतर विकास कामे कोठून आली ? भगतसिग पुतळ्याच्या कामाचे आणि विकास कामांचा काय संबंध आहे ? असे असताना विकास कामांचे देयक अदा केलेले आहे. या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली. या कामाचे टेंडर 9 टक्के अबाऊव्हने मंजूर करण्यात आले आणि त्याबाबत अध्यक्षांना कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. स्वत:च्या अधिकारात ते देयक मंजूर केलेले आहे. या कामात अनियमितता झालेली आहे आणि मूळ भगतसिंग पुतळ्याचे काम जसेच्या तसे राहिलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ज्या अटीं घालून दिल्या होत्या त्याचे पालन झालेले नाही हे खरे आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलिपी नाही

ता.प्र.क्र.42991....

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाच्या कामाचे देयक ठेकेदाराला अदा केले नाही. ती सर्व कामे 10 लाख रुपयांची होती. या कामांबरोबरच जी इतर विकास कामे झालेली आहेत त्या कामांचे देयक ठेकेदाराला अदा करण्यात आले आहे. या कामांना कार्योत्तर मंजुरी घेतली होती हे खरे आहे. या कामाची निविदा काढल्यानंतर दि.19 ऑगस्ट, 2009 च्या विशेष महासभेने 8 विरुध्द 1 च्या बहुमताने या कामाला कार्योत्तर मंजुरी दिली आहे. इतर विकास कामांचे पैसे ठेकेदाराला दिले आहे. शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाच्या कामाचे देयक अदा केले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, जे अंदाजपत्रक बनविले होते त्या अंदाजपत्रकात इतर कोणती कामे समाविष्ट केली होती, शहीद भगतसिंग पुतळ्याजवळ कोणतीही कामे केली नाहीत. केली असल्यास त्यामध्ये कोणकोणत्या कामांचा समावेश होता ?

श्री.उदय सामंत : महोदय, इतर विकास कामांसाठी कार्यकारी अभियंता यांनी दि.1/7/2009 रोजी तांत्रिक मंजुरी दिली होती आणि जिल्हाधिकाऱ्यांनी दि.21/7/2009 रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामाची निविदा 10 लाख रुपयांची काढली होती. शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम घेण्यात आले. इतर कामांमध्ये खेडीवाला पाणपोईचे काम, पेव्हर ब्लॉक, प्लींथ बीम वर्क इत्यादी कामांचा समावेश होता. त्या कामांचे देयक ठेकेदाराला अदा केले आहे. भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाच्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

ॲड.आशिष शेलार : महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम आणि इतर कामे ही दोन वेगवेगळी कामे आहेत. परंतु बजेटमध्ये ती कामे मंजूर करुन घेण्यासाठी एकत्र दाखविली आणि काम करताना मात्र त्यांना अलग अलग करण्यात आले. या साठी स्थानिक नगरपरिषदेची प्रशासकीय मंजुरी घेतली नाही. प्रशासकीय मंजुरी घेतली नसेल तर परस्पर ज्या अधिकाऱ्यांनी हा सर्व प्रकार केला त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : महोदय, शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे आणि इतर विकास कामे करणे असे एकत्र काम होते. त्यापैकी जी इतर कामे झाली आहेत त्याचे देयक ठेकेदाराला अदा करण्यात आले आहे. शहीद भगतसिंग पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम झाले नाही. त्यामुळे त्या कामाचे देयक अदा केले नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, माझ्याकडे तांत्रिक मंजुरीचा अहवाल आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, मंजूर अंदाजपत्रकाची पाहणी केली असता (a) पेव्हर ब्लॉक मधील बाब क्रमांक 1 ते 6, (b) डेव्हलपमेंट ऑफ पेडल स्टॉलमधील बाब क्रमांक 5 व 6 (c) डेव्हलपमेंट ऑफ कमानमधील बाब क्रमांक 16, 20 व 21 या बाबींची देयके अदा झाल्याचे दिसून येत आहे. महोदय, ही कामे झालीच नाहीत. तांत्रिक मंजुरी देत असताना देयक अदा केल्याचे नमूद केले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, काम झालेले नसताना देयक अदा केले ही बाब खरी आहे काय ? अन्यथा नंतर आम्हाला माननीय राज्यमंत्र्यांवर हक्कभंग प्रस्ताव आणता येईल.

श्री.उदय सामंत : महोदय, पहिल्या टप्प्याच्या कामाला तांत्रिक मंजुरी घेतली होती. त्या कामाचे ठेकेदाराला देयक अदा केले आहे. त्यानुसार दि.4 जानेवारी, 2010 रोजी 2 लाख 72 हजार 389 रुपयांचे पहिले देयक अदा केले आहे. सन्माननीय सदस्यांकडे जी अधिकची माहिती आहे त्या बाबत चौकशी केली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी दमणगंगा-पिंजाळ, गारगाई व पिंजाळ या धरणांच्या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

(३) * ४२६०७ डॉ.दिपक सावंत, श्री.दिवाकर रावते, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.विनायक राऊत : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार वाढत जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी दमणगंगा-पिंजाळ तसेच गारगाई व पिंजाळ धरणांच्या निर्मितीचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेणार असल्याचे माहे एप्रिल, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दमणगंगा-पिंजाळ हा "राष्ट्रीय प्रकल्प" म्हणून घोषित करण्याची विनंती मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान मा.पंतप्रधानांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईच्या पाणी समस्या सोडविणारा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता: (१) महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या शिफारसीनुसार मध्य वैतरणा प्रकल्प पूर्ण झाल्यावर गारगाई व पिंजाळ हे जलस्त्रोत विकसित करण्याचे पूर्वीच ठरले आहे.

(२) दमणगंगा - पिंजाळ हा "राष्ट्रीय प्रकल्प" म्हणून घोषित करण्याची विनंती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या पत्राद्वारे मा.पंतप्रधानांना केली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) मुंबईच्या पाणी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने गारगाई प्रकल्प (प्रतिदिनी ४४० द.ल.लि.), पिंजाळ प्रकल्प (प्रतिदिनी ८६५ द.ल.लि.) व दमणगंगा-पिंजाळ नदी जोड प्रकल्प (प्रतिदिनी १५८६ द.ल.लि.) राबविण्यासाठीची प्राथमिक अभियांत्रिकीची कामे हाती घेतली आहेत.

डॉ.दीपक सावंत : महोदय, मुंबईतील वाढती लोकसंख्या विचारात घेता मुंबईला जादा पाण्याची गरज आहे. त्यासाठी दमणगंगा-पिंजाळ, गारगाई व पिंजाळ ही दोन धरणे करण्यात येत असून, त्यातून 1586 द.ल.ली. जादा पाणी मिळणार आहे. हा प्रकल्प घोषित झाला आहे. आम्ही असा प्रश्न विचारला होता की, हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात येणार आहे काय ? या प्रश्नाला असे लेखी उत्तर दिले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्यासाठी दिनांक 30 सप्टेंबर, 2011 रोजी माननीय पंतप्रधानांना पत्र लिहिले होते.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42607.... डॉ. दीपक सावंत ....

त्या पत्राचे नेमके काय झाले ? राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्याबाबत आजपर्यंत उत्तर मिळाले का ? दमणगंगा-पिंजाळ या प्रकल्पाच्या बाबतीत राष्ट्रीय जल विकास संस्थेने पाहणी केली, सर्वेक्षण केले. नाशिक जिल्ह्यामध्ये या सर्वेक्षणाला विरोध झाला आणि त्यामध्ये अडचणी निर्माण करण्यात आल्या, हे खरे आहे का ? ठाणे जिल्ह्यामध्ये पिंजाळ धरणाच्या भूसंपादनाचे काम कोठपर्यंत आले आहे, ते भूसंपादन झाले की नाही आणि या प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्यासाठी आदरणीय मुख्यमंत्र्यांनी आदरणीय पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे आणि त्याचा पाठपुरावा देखील चालू आहे. दमणगंगा-पिंजाळ या ठिकाणी जो मध्य वैतरणा प्रकल्प आहे तो पूर्णत्वाकडे गेलेला आहे आणि त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत एक पूल अपूर्ण अवस्थेमध्ये आहे. त्या पुलाचे काम 15 ऑगस्ट किंवा 1 सप्टेंबरपर्यंत पूर्णत्वास जाईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मिळालेली आहे. मध्य वैतरणा धरणातून जे पाणी मिळणार आहे ते मुंबईकरांना मिळेल. गारगाई आणि पिंजाळ प्रकल्प असे दोन प्रकल्प येत आहेत. त्यामध्ये पिंजाळ प्रकल्प मुंबई महानगरपालिकेकडून करण्याबाबत जलसंपदा विभागाने मान्यता दिलेली आहे. गारगाई प्रकल्पाची फाईल देखील जलसंपदा विभागाकडे गेलेली आहे. येत्या 8-10-15 दिवसात जलसंपदा मंत्री यांच्याशी चर्चा करुन गारगाई प्रकल्प देखील मुंबई महानगरपालिकेकडून करण्याच्या संदर्भात शासनाच्या सूचना निर्गमित होतील. पिंजाळ प्रकल्पाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात येईल.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो कारण मुंबई शहरासाठी अतिशय आवश्यक असलेल्या 1586 द.ल.लिटरच्या दोन्ही प्रकल्पाबाबत जलसंपदा विभागाकडून महापालिकेला आठ दिवसात कळविणार तसेच दुसऱ्या प्रकल्पाच्या बाबतीत भूसंपादन सुध्दा होईल असे त्यांनी सांगितले. या प्रकल्पाची मुंबईला खूप आवश्यकता आहे. त्यामुळे जेएनएनयुआरएमखाली हा प्रकल्प करण्याची शासनाची मानसिकता किंवा भूमिका आहे का ? याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42607 .... ॲड. आशिष शेलार ...

एस्टिमेटेड कॉस्ट किंवा डिटेल रिपोर्ट आपल्याकडे असेल तर त्यानुसार या प्रकल्पाची एस्टिमेटेड कॉस्ट किती आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मुंबईच्या दृष्टीने हा एक अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे आणि त्यामुळे हा प्रकल्प राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पामध्ये समाविष्ट करावा यासाठी आमचा पाठपुरावा चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे या प्रकल्पाची एकूण किंमत 11 हजार 800 कोटी रुपये आहे. त्यापैकी मुंबई महानगरपालिकेचा वाटा 8 हजार 500 कोटी रुपयांचा आहे आणि नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट एजन्सीचा वाटा 3 हजार 300 कोटी रुपयांचा असेल. नदी जोड प्रकल्पाबद्दल राष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक चर्चा चालू आहे. महाराष्ट्रातून आपण फार मोठे प्रकल्प प्रस्तावित केलेले नाहीत. हाच एक प्रकल्प आपण प्रस्तावित केलेला आहे आणि त्याचा पाठपुरावा चालू आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असा उल्लेख केला की, पुलाचे काम 15 ऑगस्ट पर्यंत पूर्ण होईल. या पुलाचे बांधकाम कधी सुरु केले, त्याला किती वर्षे झाली ? पावसाळ्यामध्ये पडणाऱ्या पावसाचे पाणी जमा झाल्याशिवाय त्या धरणाचा उपयोग होणार नाही. त्यामुळे तो पूल पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. हा पूल लवकर पूर्ण करण्याबाबत माननीय महापौर गेल्या सहा महिन्यांपासून वारंवार विनंती करीत आहेत. कारण त्याशिवाय मुंबईकरांना पाणी मिळणार नाही. त्या पुलाचे काम कधी सुरु केले आणि आपण सांगितल्याप्रमाणे 15 ऑगस्टपर्यंत पुलाचे काम पूर्ण होणार आहे का ? माननीय मुख्यमंत्र्यांनी आता जे सांगितले त्याबद्दल धन्यवाद त्यांना देतो. परंतु मुंबईचे शांघाय करा असे माननीय पंतप्रधानांनी म्हटल्यानंतर मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर अनेक ठिकाणी गरज आहे म्हणून आणि आवश्यकता आहे म्हणून आपण एफएसआय वाढवितो. याचा अर्थ लोकसंख्येनुसार पाण्याची गरज वाढणार आहे. पाण्याच्या गरजेप्रमाणे काम झाले पाहिजे. त्यास अनुसरुन राष्ट्रीय प्रकल्प करण्याबाबत आपण जे पत्र लिहिले आहे त्याला आता दोन वर्षे झालेली आहेत अजूनपर्यंत त्याला मान्यता मिळालेली नाही. राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता मिळाल्यानंतर त्या प्रकल्पाचे भवितव्य वेगळ्या पध्दतीने घडेल. गोसीखूर्द प्रकल्प केंद्राकडून नियोजित होता. विदर्भाला आलेल्या पॅकेजच्या अंतर्गत तो प्रकल्प होता आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 42607 ..... श्री. दिवाकर रावते ....

त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची वाच्यता केंद्रापर्यंत गेल्यानंतर गोसीखूर्द प्रकल्पाला येणारा निधी आखडता घेतला गेला. आपण पत्र लिहिले त्याला दोन वर्षे झालेली आहे. त्यामुळे मला ही शंका येते की, त्याचा परिणाम म्हणून मुंबईची तातडीची गरज असताना या प्रकल्पाला मान्यता देण्यास उशीर होतो का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42607.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : राष्ट्रीय प्रकल्प एआयबीपी अंतर्गत घोषित करणे व या प्रकल्पाचा नदी जोड प्रकल्पात अंतर्भाव करणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. राष्ट्रीय प्रकल्प झाला तर त्यासाठी 90 : 10 या सूत्राप्रमाणे निधी खर्च केला जातो. राष्ट्रीय प्रकल्पाचा आर्थिक बाबीशी संबंध आहे. त्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारकडून खर्च केला जातो. सन्माननीय सदस्यांनी विदर्भातील गोसीखूर्द प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. तो प्रकल्प खूप दिवसांपूर्वी राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केला होता. त्या प्रकल्पासाठी 90 टक्के केंद्र सरकारकडून निधी मिळतो. परंतु हा नदी जोड प्रकल्प म्हणून स्वीकारावयाचा काय असा प्रश्न आहे. नदी जोड प्रकल्पाबाबत एनडीए सरकारच्या काळामध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे. त्यावेळी श्री.सुरेश प्रभू यांना ही जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी खूप लिंकस् तयार केल्या होत्या. परंतु जोपर्यंत या प्रकल्पात समावेश झालेल्या राज्यांचे सहकार्य मिळत नाही तोपर्यंत हे करणे अवघड असते. राष्ट्रीय प्रकल्प ही बाब वेगळी आहे. त्यासाठी निधी कोण खर्च करणार हा त्यातील विषय आहे. परंतु नदी जोड प्रकल्प करावयाचा किंवा नाही या संदर्भात केंद्रीय जलसंधारण मंत्रालयामध्ये हा विषय सुरु आहे. राज्य सरकारचा त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. या प्रकल्पाबाबत दोन राज्यांचा संबंध असल्यामुळे तो वेगळ्या धर्तीवर ते मान्य होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सिंचनामध्ये घोटाळे झाल्यामुळे यापुढे नवीन प्रकल्प घेणार नाही असे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनीही अनेक वेळा अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण केल्याशिवाय नवीन सिंचन प्रकल्प सुरु करणार नाही असे जाहीर केलेले आहे. तथापि, सभागृहात विसंगत उत्तर दिले जात आहे. तेव्हा यातील कोणते उत्तर खरे आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे. लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या शिफारशीनुसार मध्य वैतरणा प्रकल्प पूर्ण झाल्यावर गारगाई व पिंजाळ हे जलस्त्रोत विकसित करण्याचे पूर्वीच ठरले आहे." चितळे समिती किती ठिकाणी नेमलेली आहे, या समितीची नेमणूक कधी केली होती, त्या समितीने शासनाला अहवाल केव्हा सादर केला आहे ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42607.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी या निमित्ताने वेगळ्या पध्दतीने सभागृहाला माहिती दिली आहे. नवीन सिंचन प्रकल्प न घेण्याचे शासनाचे कोणतेही धोरण नाही. जुन्या प्रकल्पाला प्राधान्य द्यावयाचे आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्य आता जे बोलले आहेत त्यात फरक आहे. गेल्या वेळी चितळे समिती नेमण्यात आली त्या समितीच्या माध्यमातून शासनाला मार्गदर्शन मिळावे असा उद्देश आहे. पण नवीन प्रकल्प घ्यावयाचे नाहीत असे धोरण शासनाला स्वीकारता येणार नाही. ज्या प्रकल्पांचे काम 80 टक्के, 90 टक्के पूर्ण झालेले आहे ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने प्राथम्य दिले पाहिजे असे धोरण आहे. परंतु अंतिम धोरण हा अहवाल आल्यानंतर ठरणार आहे. दमणगंगा-पिंजाळ या संबंधी चितळे समिती नेमण्यात आलेली तारीख सध्या माझ्याजवळ उपलब्ध नाही. परंतु हा प्रकल्प जुना आहे आणि त्यावेळचा हा प्रस्ताव आहे.

डॉ.डी.पी.सावंत : राष्ट्रीय प्रकल्प व नदी जोड प्रकल्प या दोन वेगवेगळ्या कल्पना आहेत. राष्ट्रीय प्रकल्पाचा पैशाशी संबंध आहे. परंतु नदी जोड प्रकल्प हा आंतरराज्यीय विषय असल्यामुळे शासनाने शेजारच्या राज्यांचा सल्ला घेतलेला आहे काय, नदी जोड प्रकल्पाला आपल्या राज्यातच नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे हे खरे आहे काय, खरे असेल तर तेथील स्थानिक नागरिकांना शासनाने विश्वासात घेतले आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : नदी जोड प्रकल्प स्वीकारावयाचा किंवा नाही हा विषय केंद्रीय जलसंधारण विभागाशी संबंधित विषय आहे. त्यामुळे संबंधितांना बोलवून त्यांची संमती घेऊनच शासनाला पुढे जाता येईल. स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी राज्यातील जलसंपदा विभागामार्फत सर्वांना निश्चितपणे विश्वासात घेण्यात येईल.

3.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

NTK/ D/ KTG/

कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

(4) * 42669 **श्री.रमेश शेंडगे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विनायकराव मेटे, श्री.अब्दुला खान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण, श्री.राम पंडागळे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय पाटील** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यास तसेच या स्मारकाचा पूर्ण खर्च करण्यास शासनाने माहे मार्च, 2013 मध्ये वा त्या दरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(3) या योजनेवर किती खर्च अपेक्षित आहे व कामास केंव्हा सुरुवात करण्यात येईल ?

प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1), (2) व (3) कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यांस शासनाने तत्वत: मान्यता दिलेली असून जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, दिनांक 12 मार्च, 2013 अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. स्मारकाची संकल्पना, आराखडे, अंदाजपत्रके व तद्नुषंगिक बाबींच्या अनुषंगाने शिफारशी शासनास सादर करण्यासाठी समितीस सहा महिन्यांचा अवधी दिलेला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, या राज्यातील बहुजनाच्या आरक्षणाचे जनक, समतेचे प्रतिक, 110 वर्षापूर्वी या राज्यामध्ये गोरगरीब जनतेला आरक्षण देऊन त्यांनी समतेच्या प्रवाहामध्ये आणणाऱ्या छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने व विचाराने सामाजिक व राजकीय जीवनामध्ये राज्यकर्ते काम करतात. या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी माहिती द्यावी अशी माझी अपेक्षा आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील अधिवेशनामध्ये छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक कोल्हापूर येथे होण्यासाठी माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे जाहीर केले. या गोष्टीला साडेचार महिने होऊन गेले. हे स्मारक होण्याच्या दृष्टीने या समिती मार्फत काय हालचाल झालेली आहे ? जी जागा वस्त्रोद्योग महामंडळाची आहे ती शासनाच्या ताब्यात आलेली आहे काय, नसल्यास जागा ताब्यात घेऊन छत्रपती शाहू महाराजांच्या स्मारकाचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

काही दिवसापूर्वी कंपनीच्यावतीने एका वकिलाने वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली होती की या जागेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे विक्री-व्यवहार, गहाण, विकसनकरार, कुलमुखत्यार किंवा हस्तांतरण करता येणार नाही. त्यामुळे आमच्या सारख्या शाहूप्रेमी जनतेच्या मनामध्ये शंका निर्माण झालेल्या आहेत. हे स्मारक होण्याच्या बाबतीत काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत काय ? तसेच अशा प्रकारची नोटीस कोणी दिलेली आहे काय, असल्यास हे स्मारक पूर्ण होण्यामध्ये काही अडथळे निर्माण होणार आहेत काय ? या स्मारकाचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व स्मारक केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे?

प्रा. फौजिया खान : कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराज यांचे स्मारक उभारण्याच्या संदर्भात 11.12.2012 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनामध्ये एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून या स्मारकास तत्वत: मान्यता देण्यात आली. त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. दिनाक 7.5.2013 रोजी या समितीची बैठक संपन्न झाली. स्मारकाच्या अनुषंगाने काय काय करता येईल यासंबंधीचे अभिप्राय घेण्यासाठी इतिहास संशोधक, वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व विभागाचे अधिकारी यांची बैठक घेऊन स्मारकासंबंधीचा प्रस्ताव सादर करण्याच्या संदर्भात तसेच स्मारकाच्या संदर्भातील जागेचा नकाशा, दिशा वगैरे वेबसाईटवर प्रसिध्द करुन जनतेच्या संकल्पना, अभिप्राय इत्यादी घेण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्तांना निदेश देण्यात आले. या निदेशाच्या अनुषंगाने आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी प्रस्तावित आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने इतिहास तज्ज्ञ, वास्तुशिल्पकार यांची 21.5.2013 रोजी बैठक घेऊन या स्मारकाचे म्युझियम,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पेंटिंग, लेझर शो, बोटींग, शॉपिंगसेंटर, शिकार, शेतकरी संग्रहालय, चहाचे मळे, राधानगरी धरण, आरक्षण, बालसुधार वसतिगृह, नाट्यगृह, कुस्ती प्रशिक्षण केंद्र इत्यादी बाबत मिटींग घेतली. आयुक्त महानगरपालिका यांनी या प्रस्तावित स्मारकाची देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये ठराव देखील पारित केला आहे.

महानगरपालिकेने आंतरराष्ट्रीय स्तरावर आराखडे मागविण्यासाठी स्पर्धा घेण्याचे ठरविले असून 7 लाख रु. आणि 3 लाख रु. अशी प्रथम व द्वितीय बक्षिसे घोषित केलेली आहेत. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक्स्प्रेशन ऑफ इण्टरेस्ट प्रसिध्द केलेले आहे. तसेच हे सर्व दिनांक 10.7.2013 रोजी संकेतस्थळावर टाकलेले आहे. तसेच वर्तमानपत्रामध्ये देखील प्रसिध्द करण्यात आले आहे. संकेत स्थळावर सूचना देण्यासाठी 29.7.2013 ही शेवटची तारीख आहे. हे खरे आहे की, कोर्टामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली होती आणि ती याचिका डिस्ट्रिक्ट कोर्टामध्ये खारीज करण्यात आली. त्यानंतर हायकोर्टामध्ये याचिका दाखल करण्यात आलेली असून त्याबाबतीत सुनावण्या झाल्या आहेत. परंतु कोणत्याही प्रकारचा स्टे देण्यात आलेला नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : छत्रपती शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे स्मारक शाहू मिलच्या जागेवर उभे करण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण त्याच बरोबर शाहू महाराजांचे जे जन्मस्थान आहे त्याचे नूतनीकरण करण्याचा विषय अनेक वर्षे रेंगाळलेला आहे. शाहू महाराजांची समाधी उघडयावर आहे, तिला आच्छादित केले जात नसल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत आहेत.

...यनंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

ता.प्र.क्र.42669.... श्री.चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून प्रश्न विचारु इच्छितो की, शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक करण्याआधी शाहू महाराजांच्या जन्मस्थानाच्या नूतनीकरणाचे काम करण्यात येईल काय,शाहू महाराजांची समाधी उघडयावर आहे, ती समाधी प्रोटेक्ट करण्याचे देखील काम करण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, होय.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा पुढे घेऊन जाणारे आपले राज्य आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या कालखंडात काही क्रांतीकारक निर्णय घेतले आहेत. मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचा देखील निर्णय घेतला आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, शाहू महाराजांचे स्मारक उभारण्यासंदर्भात पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली आहे. त्या समितीमध्ये स्मारकाची संकल्पना, आराखडे दर्शविण्यासाठी तज्ज्ञ सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे काय, असल्यास ते तज्ज्ञ सदस्य कोण आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, पालक मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्या समितीमध्ये स्थानिक मंत्री, महापौर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विधानसभा सदस्य श्री.क्षीरसागर, इतिहास तज्ज्ञ श्री.जयसिंग पवार यांचा समावेश आहे. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, अपर मुख्य सचिव, पर्यटन विभाग यांचा देखील या समितीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मागील काही महिन्यांमध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या पुढाकाराने राज्यात ऐतिहासिक पाऊल उचलले गेले आहेत. शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईत आंतरराष्ट्रीय स्मारक, छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक उभारण्यासंबंधी ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे या राज्यातच नव्हे तर देशपातळीवर माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि लोकाभिमुख सरकारचे अभिनंदन झालेले आहे. ही सर्व स्मारके आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्यासंबंधी शासनाचा ध्यास आहे. ही सर्व आंतरराष्ट्रीय स्मारके

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लवकरात लवकर पूर्ण व्हावीत असा प्रयास शासनाचा आहे. या बाबतीत मॉनेटरींग, को-ऑर्डिनेशन आणि कंट्रोल करण्यासाठी कोणत्या स्वरुपाची यंत्रणा आहे? ही स्मारके तातडीने पूर्ण व्हावीत यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदय स्वत: प्रयत्न करीत आहेत. परंतु याबाबतीत खालच्या पातळीवरील अधिकाऱ्यांकडून योग्य तो प्रतिसाद मिळतो आहे काय याची माहिती मला प्रश्नाच्या रुपाने विचारावयाची आहे व ती माहिती माननीय मुख्यमंत्री महोदय देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक 12 मार्च, 2013 रोजी शासन निर्णय झालेला आहे, त्यात स्मारकांची संकल्पना, स्मारकांचे आराखडे इत्यादी कामे सहा महिन्याच्या आत करण्यात यावीत असा कालावधी ठरवून देण्यात आलेला आहे. ही तिन्ही स्मारके लवकरात लवकर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शाहू महाराजांचे स्मारक उभारावे असे निर्देश राज्य शासनाने दिले होते. त्यानंतर महानगरपालिकेच्या पॅनलवरील वकील श्री.प्रशांत चिटणीस यांनी मंत्री रियल्टीच्या वतीने महानगरपालिका, वस्त्रोद्योग महामंडळ व राज्य शासनाला इशारा देणारी नोटीस पाठविली आहे हे खरे आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, त्यांनी कोर्टातही केस दाखल केलेली आहे. ही गोष्ट मी अगोदरच सांगितली आहे. सदर केस हायकोर्टाने दाखल करुन घेतलेली आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, या बाबतीत आपल्याला कोणत्या प्रकारची स्टे ऑर्डर मिळालेली नाही. आम्ही या बाबतीत प्रश्न विचारल्यानंतर दिनांक 10 जुलै, 2013 रोजी संकेत स्थळावर यासंबंधीची माहिती आली. आपण दिनांक 29 जुलै, 2013 पर्यंत कालावधी ठेवलेला आहे. आपल्याला स्टे ऑर्डर मिळालेली नाही तर मग अजून पर्यंत जमीन का ताब्यात घेण्यात आली नाही, जमीन ताब्यात घेतली असेल तर बांधकामास सुरुवात का करण्यात आली नाही? स्मारक बांधण्याविषयी सर्व तयारी पूर्ण झालेली आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंबंधीची माहिती जाहीर केली आहे. एका अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नानंतर समिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गठीत झाली. दुसऱ्या अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नानंतर संकेत स्थळावर माहिती आली. अशी अनेक अधिवेशने या कामासाठी जावयास पाहिजेत काय, या शाहू महाराजांच्या स्मारकाच्या बांधकामास प्रत्यक्षात सुरुवात कधी करण्यात येणार आहे ?

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व जनतेला आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना शाहू महाराजांबद्दल नितांत आदर आहे. म्हणूनच शासनाने शाहू मिलच्या जागेवर स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सन 2005-06 मध्ये त्या ठिकाणी एक टेक्स्टाईल पार्क उभे करण्याबाबत निविदा काढण्यात आली होती. एका आवेदकाने निविदा भरली होती. त्यांनी कोर्टात धाव घेतली होती. जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयात त्यांच्याविरुध्द निकाल लागला. न्यायालयाने या प्रकरणी कोणताही स्टे दिलेला नाही. त्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेऊन पालकमंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा देखील केली आहे. तो दावा मागे घेतला जाईल अशी मला खात्री आहे. खालच्या न्यायालयात निकाल शासनाच्या बाजूला लागलेलाच आहे.

सभापती महोदय, जमीन वस्त्रोद्योग महामंडळाची म्हणजे शासनाच्या मालकीची आहे. त्यात इतर कोणतीही अडचण राहिलेली नाही. परंतु चांगल्या निविदा याव्यात, चांगल्या संकल्पना पुढे याव्यात यासाठी Project management consultant नेमणे आवश्यक आहे. त्याकरिता 29 जुलै ही शेवटची तारीख आहे. चांगले डिझाईन करुन चांगले स्मारक व्हावे आणि ते सर्व संबंधितांना मान्य व्हावे ही प्रक्रिया सुरु आहे. या प्रकल्पासाठी निधी बिलकूल कमी पडू दिला जाणार नाही. कोल्हापूर शहराकरिता आणि महाराष्ट्राला अभिमान वाटेल अशा प्रकारचे स्मारक करण्याचे मी आश्वासन आपल्या सर्वांना देतो. कोणतीही आर्थिक अडचण येणार नाही. फक्त आम्हा सर्वांची अपेक्षा आहे की, आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होण्यासाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना बोलावून, आर्किटेक्ट बोलावून, हेरिटेज आर्किटेक्टना बोलावून चांगले स्मारक उभे करण्यासाठी चांगल्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्टनी काम करावे एवढाच उद्देश आहे. ते काम निश्चितपणे अग्रक्रमाने करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हाडाच्या दिनांक ३१ मे, २०१३ च्या सोडतीला मिळालेला कमी प्रतिसाद

(५) * ४२९७४ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या दिनांक ३१ मे, २०१३ रोजीच्या सोडतीला महागड्या घरांमुळे तुलनेने कमी प्रतिसाद मिळाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच म्हाडाच्या स्थापनेमागचे मूळ धोरण आणि नवीन घरांची योजना परस्पर विसंगत असल्याच्या तज्ञांच्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकभारतीने दिनांक २२ मे, २०१३ रोजी वा त्या सुमारास म्हाडा उपाध्यक्षांना या संदर्भाबाबत दिलेल्या निवेदनावर शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या १२४४ सदनिकांच्या दिनांक ३१.५.२०१३ रोजीच्या सोडतीसाठी एकूण ९३,५५९ एवढ्या अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरुन प्रतिसाद दिला होता. यास्तव त्यास कमी प्रतिसाद मिळाला, असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

(२) व (३) म्हाडाच्या स्थापनेमागचे मूळ धोरण आणि नवीन घरांची योजना परस्पर विसंगत अशा आशयाच्या तज्ञांच्या तक्रारी व लोकभारतीचे निवेदन म्हाडास प्राप्त झालेले दिसून येत नसले तरी ते उपलब्ध करण्यात येईल. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, सदनिकांचे हस्तांतरण व अदलाबदल) नियमावली, १९८१ च्या कलम ५ ते २१ च्या तरतुदींप्रमाणे म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिकांच्या सोडतीचे धोरण निश्चित करणे तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम, १९८१ च्या कलम ११ (२) अन्वये म्हाडाच्या सदनिकांची किंमत निश्चित करण्यास म्हाडा प्राधिकरण सक्षम आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, उत्तराबाबत माझा आक्षेप आहे. उत्तर क्रमांक ३ मध्ये म्हटले आहे की, तज्ज्ञांच्या तक्रारी आणि लोकभारतीचे निवेदन म्हाडास प्राप्त झालेले दिसून येत नाही. म्हाडाच्या उपाध्यक्षांना निवेदन दिले त्यावेळी मी स्वत: उपस्थित होतो. असे असताना लेखी उत्तर पाठविताना निवेदन प्राप्त झाले नाही असे जर म्हाडाचे म्हणणे असेल तर या गंभीर बाबीची आपण दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, म्हाडाची निर्मिती सर्वसामान्य गरीब लोकांसाठी घरे बांधण्याकरिता झालेली आहे. परंतु आज म्हाडाकडून बांधण्यात आलेली घरे सर्वसामान्य व गरीब लोक विकत घेऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. म्हाडाचे मूळ धोरण रेंटल हाऊसिंगचे होते हे खरे आहे काय? असल्यास हे धोरण बदलण्याची कारणे काय आहेत?

सभापती महोदय, बांधकामाकरिता तात्पुरती घरे उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे. सध्या या बांधकामासाठी खर्च किती येतो, बांधकामाचा मार्केट रेट काय आहे, गरीब आणि मध्यमवर्गीयांची मागणी किती आहे, या वर्गासाठी आणि उच्च वर्गासाठी किती घरे बांधली जात आहेत?

...३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42974.....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, म्हाडाची निर्मिती सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे देण्याकरिता झालेली आहे. त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. प्रत्येक प्रकल्पाशी रिलेटेड असलेली कॉस्ट निश्चित करावी लागते. सभापती महोदय, म्हाडाकडून सोसायटीला लिज होल्डवर जागा देण्याची भूमिका घेतली जाते. खरेदी आणि विक्री करीत असताना जमिनीचा मालकी हक्क म्हाडाकडे राहतो. रेंटल हाऊसिंगची कल्पना यापूर्वी नव्हती आणि पुढेही नाही. बांधकाम करताना दर ठरविले जातात ते त्या भागात जमिनीचा रेडी रेकनर रेट काय आहे, त्यावरील टॅक्सेशन, बांधकामाचा खर्च किती येतो यावर आधारित कॉस्ट निश्चित केली जाते. काही योजनांमध्ये ॲडिशनल कॉस्ट अंतर्भूत केली जाते. काही प्रकल्पामध्ये गटार-नाले, पाण्याचा प्रकल्प, एसटीपी प्रकल्प यामुळे कॉस्ट वाढली आहे. त्यामुळे निश्चितपणे दर अधिक दिसून येतो. म्हणून आता अशी भूमिका घेतली आहे की, देश स्तरावर दीपक पारेख समिती गठीत केली आहे त्या समितीकडून परवडणाऱ्या घराची नेमकी व्याख्या काय असली पाहिजे हे ठरविले जाणार आहे, त्याच धर्तीवर राज्य सरकारची समिती नेमण्याचा विचार आहे.

नंतर आय.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :42974 .....

श्री. सचिन अहिर .....

म्हाडाची घरे बांधण्याची जी मूळ संकल्पना आहे ती पुढील काळात म्हाडाने पार पाडणे आवश्यक आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाला घरे बांधण्यासाठी शासनाकडून फुकटामध्येच जमिनी मिळत असतात. चौरस फूटाचा बांधकाम खर्च, नाले, गटार,गार्डन या सर्वांचा खर्च त्यामध्ये ॲड होत असतो. अत्यल्प उत्पन्न गटाला, गरीब वर्गाला परवडणारी घरे म्हाडाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुंबईत आज खाजगी बिल्डर 50 ते 60 हजार रुपये चौरस फूटाने घरे विकत आहेत. खाजगी बिल्डर ज्या दराने घरांची विक्री करीत आहेत त्याच दराने आता म्हाडा घरांची विक्री करीत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. म्हाडाला किंवा खाजगी बिल्डरांना बांधकामासाठी जो खर्च येतो तोच खर्च त्यांनी घेणे बंधनकारक असले पाहिजे. काडयाच्या पेटी पासून ते टीव्हीपर्यंत उत्पादन खर्चावर आधारित दर लावलेले असतात परंतु केवळ लोकांकडून नफा काढण्याच्या उद्दिष्टाकडे म्हाडा आणि खाजगी बिल्डरही चालले असल्यामुळे सर्वसामान्य माणसाला आता मुंबईत घर मिळणार नाही. त्यामुळे उत्पादन खर्चावर आधारित किंमती ठरविल्या जाणार आहेत काय ? शासन म्हणून चौरस फूटाच्या किमती ठरविल्या जाणार आहेत काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, म्हाडाला शासनाकडून मोफत जमीन दिली जाते परंतु ज्यावेळी व्हॅल्यूएशन म्हणून जी काही कॉस्ट पकडतो त्याधर्तीवरच व्हॅल्यूएशन कॉस्ट पकडली गेली पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे त्याबाबत निश्चितपणे नोंद घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, म्हाडाची कन्स्ट्रक्शन कॉस्ट काय आहे, म्हाडाची घरे देण्याची योजना आपण कोणासाठी सुरु केली आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, कन्स्ट्रक्शन कॉस्ट व्हेरिअस होत असते. म्हाडाची जी मूलभूत कन्स्ट्रक्शन कॉस्ट आहे ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :42974 .....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गरीब लोकांना जास्त किंमतीने खाजगी बिल्डरकडून घरे विकत घेता येत नसल्यामुळेच शासनाने म्हाडाची स्थापना केलेली आहे. म्हाडाला जमीन सुध्दा फुकट उपलब्ध होत असते. चांगली इमारत बांधली तरी सुध्दा तिचा प्रती चौरस फूट दर 1400 च्या वर जात नाही. म्हाडा आज ज्या दर्जाचे बांधकाम करते त्याचा दर्जा जास्तीत जास्त 800/900 प्रती चौ.फूट इतकाच आहे. त्यामुळे म्हाडा व्यापार करण्यासाठी स्थापन झाली आहे की, गरिबांना घरे देण्यासाठी स्थापन झाली आहे ? राज्य शासनाच्या मूळ धोरणापासून म्हाडा दूर जात असेल तर म्हाडा त्याचा पुनर्विचार करणार आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाने घराची किंमत किती लावावी यासंदर्भात 1992 मध्ये म्हाडा प्राधिकरणाचे धोरण निश्चित करण्यात आले होते व त्यानुसार विक्री किंमत ठरवितांना जमिनीची किंमत ठरवली जाते. यामध्ये मोफत जमीन मिळाली असेल तर त्याचा दर लावला जात नाही. परंतु जो काही विकास खर्च आला असेल तो गृहीत धरला जातो. इमारतीचा बांधकाम खर्च अनुषंगिक खर्च, व्याज, प्रशासकीय खर्च, बाहय सुविधांचा खर्च या सर्व गोष्टींचा विचार करुन खर्च निश्चित केला जात असतो.

सभापती महोदय, म्हाडाच्या घरांना मागणी नाही किंवा म्हाडाच्या घरांच्या किंमती महाग आहेत असे म्हणणे बरोबर नाही. उत्तरामध्ये म्हटले आहे की, "1244 सदनिकांसाठी जवळ जवळ 1 लाखापर्यंत अर्ज आले होते". याचा अर्थ म्हाडाच्या लॉटरीसाठी अर्ज येत नाही हे म्हणणे बरोबर नाही. परंतु तरी सुध्दा म्हाडाच्या घरांच्या किमती ठरविण्यासाठी आणखीन काय करता येईल यासाठी एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. शासनाकडून म्हाडाला अजून काही सवलत द्यावी लागणार असेल तर त्याचाही विचार करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून म्हाडांच्या घरांच्या किंमती कमी करण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील यासाठी विचार विनिमय सुरु आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी उपस्थित केलेला आहे. गोरगरिबांना किफायतशीर घरे देण्यासाठीच म्हाडाची स्थापना झालेली आहे. पूर्ण विदर्भामध्ये अनेक जागेवर आरक्षण ठेवून 30:70 टक्क्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. कोणतेही भूसंपादन न करता 30 टक्के जागा आपण अनेक लोकांकडून मोफत घेतलेली आहे. अशा परिस्थितीत मोफत घेतलेल्या जागेवर म्हाडाने घरे तयार केली परंतु बिल्डरांपेक्षा जास्त दराने लोंकांना दिलेली आहेत. त्यामुळे यासंदर्भात कार्यवाही करुन शासन गोरगरिबांना न्याय मिळवून देणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : होय.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, अनेक लोकांना लॉटरी लागल्यानंतर सुद्धा सदर घरे न परवडणारी असल्यामुळे ते विकत घेतच नाहीत. येथे रेडीरेकनर संबंधी सांगितले आहे. म्हाडा आणि बिल्डर हे दोघे मिळून बांधत असलेल्या घरामध्ये मोठी अडचण आहे. ही घरे कोंडवाड्या सारखी बांधलेली आहेत. असे असताना रेट मात्र समान आहेत. बिल्डरला म्हाडाकडे एक नंबर आणि दोन नंबरचा खर्च करावा लागतो. तो खर्च म्हाडाला करावा लागत नाही. गरिबांना परवडतील अशी घरे बांधण्यासंबंधी समिती स्थापन करण्यात आली आहे असे सांगण्यात आले आहे. ती समिती आपला अहवाल कधी देणार आहे व त्या नुसार गरीब लोकांना घरांचे वाटप कधी पर्यंत करण्यात येणार आहे ? लॉटरी लागून सुद्धा म्हाडाची घरे न परवडणारी असल्यामुळे लोकांनी घेतली नाहीत हे खरे आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, असे काही झालेले नाही. परंतु, काही रहिवाशांनी खाजगी बिल्डरपेक्षा जास्त कॉस्ट होते आहे काय, अशा प्रकारची तक्रार केलेली आहे. ती कमी करता येईल काय, हे पहावे अशी देखील सूचना केली आहे. शैलेंद्रनगर, दहिसर, मुंबई येथे अशा प्रकारची घटना घडली होती. परंतु, कुठल्याही लोकांनी घर घेतले नाही अशा प्रकारची परिस्थिती नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे आणि त्या अगोदर मी देखील सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, समिती गठीत केली आहे. त्या पुढे जाऊन सांगतो की, देशाच्या स्तरावर दीपक पारेख समिती गठीत करण्यात आली होती. त्यांनी अफोर्डेबल हाऊसिंगची संकल्पना मांडली होती. तशीच संकल्पना करून एक समिती गठीत करण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने केला जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रत्नागिरी शहराला पाणी पुरवठा करण्यासंबंधीचे योग्य नियोजन करण्याबाबत

(6) * 42155 श्रीमती अलका देसाई, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रत्नागिरी शहरातील शीळ धरणात पाण्याचा मोठ्या प्रमाणात साठा असतानाही प्रशासनाच्या नियोजनामुळे आजही रत्नागिरीवासियांना पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे मे, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पाणी पुरवठा करण्यासंबंधीचे योग्य नियोजन करण्याबाबत तसेच ढिसाळ नियोजन करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे,श्री.दिलीप सोपल यांच्याकरिता : (1) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याबाबत नागरीकांच्या तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

(2) रत्नागिरी नगरपरिषदेची वितरण वाहिनी नसलेल्या भागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 10 ठिकाणी विविध आकाराची नळ संयोजने घेण्यात आली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मूळ उद्भव हरचेरी धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने पावसाळ्यापर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्यात दिनांक 30 एप्रिल, 2013 पासून कपात करण्यास सुरुवात केली. शहरात पाणी टंचाई झाल्याचे निदर्शनास आल्यावर शीळ उद्भवातून पुढे साळवी स्टॉप जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहीनीस समांतर जोड घेऊन एकंदर 7 ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. इतर 3 ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. शिळ भागातून गेलेल्या 500 मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनची वेळोवेळी व तातडीने दुरुस्ती करण्यात आली आहे.

(3) प्रश्न उद्भवतन नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गेल्या मे महिन्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे लोकांना रस्त्यावर उतरावे लागले. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, रत्नागिरी नगरपालिका कधी स्थापन झाली, नगरपालिका स्थापन झाल्यानंतर रत्नागिरी शहराच्या पाण्यासाठी नियोजनकारांनी किंवा अधिकाऱ्यांनी कोणती योजना राबविलेली आहे, ती योजना कधी पूर्ण होणार आहे ? महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाण्याच्या जोडण्याचे काम सुरू झालेले आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून 10 ठिकाणी काम सुरू झाले असून 7 ठिकाणी प्रत्यक्षात काम देखील सुरू झालेले आहे. सदर काम आपण कधी पूर्ण

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42155....

श्रीमती अलका देसाई.....

करणार आहात ? वाढते शहरीकरण पाहता लोकांसाठी पाण्याची व्यवस्था कधी पूर्ण होणार आहे ? कोकणामध्ये धो-धो पाऊस पडत असताना टँकरने पाणी पुरवठा होणे आम्हा सर्वांना भूषणावह आहे काय हे सर्व तपासले असता ते भूषणावह नाही हे दिसून येईल. या बाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की, सात ठिकाणी काम सुरू झालेले आहे त्याला आपण अग्रक्रम द्यावा. जलकुंभाचे काम देखील सुरू करण्यात आलेले आहे ते कोणत्या साला पर्यंत आपण पूर्ण करणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, रत्नागिरी नगरपालिकेला तीन ठिकाणाहून पाणी पुरवठा होतो. शीळ धरणातून आणि साळवी ट्रीटमेंट प्लांट पासून पाणी पुरवठा होतो. साळवी ट्रीटमेंट प्लांट मधून 10 एमएलडी, नाचणे ट्रीटमेंट प्लांट मधून अडीच एमएलडी, आणि एमआयडीसीच्या हरचेरी धरणा मधून 3 एमएलडी असा जवळपास 16 एमएलडी पाणी पुरवठा रत्नागिरी शहरासाठी होतो. या उन्हाळ्यामध्ये हरचेरी धरणामध्ये पाणी कमी होते. त्यामुळे एमआयडीसीने नगरपालिकेला नोटीस दिली होती की, एप्रिल पासून आम्ही टप्प्याटप्प्याने पाणी कमी करणार आहोत. त्यांनी जूनमध्ये 65 टक्के पाणी कपात केली म्हणजे दोन एमएलडी पाणी कपात करण्यात आले. त्यामुळे त्यांनी शीळ धरणातून 4 एमएलडी जास्त पाणी घेतले. एमआयडीसी जेथे पाणी पुरवठा करते तेथे 10 ठिकाणी पाण्याची टंचाई भासली. ते एमआयडीच्या पाईपवर डायरेक्ट टॅब करीत होते. तेथे टंचाई भासण्याची शक्यता होती. एमआयडीसीने आधीच नोटीस दिल्यामुळे शीळ धरणातून 4 एमएलडी पाणी घेऊन त्यांची जेथे ओरिजिनल योजना आहे तेथे पाणी टॅब करून दिले होते. मिरकरवाडा, मुरूकवाडा आणि पात्रावाडी येथे एमआयडीसी एक एमएलडी पाणी पुरवठा करीत होते. तेथे त्यांना पाणी पुरवठा दिला होता.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रीका नाही

ता.प्र.क्र.42155...

श्री.रणजित कांबळे...

त्याशिवाय तीन टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात आला होता. आता नगरपालिकेने नगर उत्थानमध्ये साडेसहा कोटी रुपयांची नवीन योजना प्रस्तावित केलेली आहे. साळवी ट्रीटमेंट प्लान्टपासून समांतर पाईप लाईन टाकण्यात येणार आहे. आम्ही प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठविला आहे. त्यांच्याकडून मान्यता मिळाल्यानंतर ते काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. या कामासाठी जमीन संपादित करणे आवश्यक आहे. नगरपालिकेला जमीन संपादन करण्यासाठी दीड कोटी रुपये द्यायचे आहेत. नगरपालिकेने त्यांचा हिस्सा दिल्यानंतर त्यास ताबडतोब मान्यता मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील इमारती पुनर्विकासाचे विकास शुल्क विकासकांनी थकविल्याबाबत

(7) * 42272 श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतीश चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे : तारांकित प्रश्न क्रमांक 35788 ला दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई विकास नियंत्रण नियमावली 1991 च्या नियमानुसार 33 (6) आणि 33 (9) अन्वये इमारतीच्या पुनर्विकासात पुनर्विकासाच्या 104 प्रस्तांवापैकी 628 कोटी विकास शुल्क विकासकांकडून थकविल्या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाकडून काहीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर थकीत रक्कम वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) विकास नियंत्रण नियमावली, 1991 च्या नियम 33 (6) व नियम 33 (9) अन्वये विकास शुल्काची रक्कम प्रलंबित नाही तथापि विकास नियंत्रण नियमावली 33 (7) अन्वये मंजूर करण्यात आलेल्या 104 पुनर्विकास प्रस्तावामध्ये 63.92 कोटी इतके भांडवली मूल्य थकित आहे.

(2) व (3) थकीत भांडवली मुल्याच्या वसूलीबाबत महानगरपालिकेमार्फत पुढील प्रमाणे कार्यवाही केली जात आहे :-

(अ) ज्या पुनर्विकास प्रस्तावात प्रकल्प कालावधी संपलेला आहे व भांडवली मुल्य देय आहे अशा विकासकांना काम थांबवण्याचे आदेश बजाविण्यात आलेले आहे.

(ब) सन 2010 पूर्वी मंजुरी दिलेल्या प्रकरणांमध्ये इरादापत्रामधील अटीमध्ये प्रकल्प कालावधी व भांडवली मूल्य देण्याची बाब संलग्न केलेली नव्हती. 90% भांडवली मूल्य हे इमारतीला भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना-हरकत देतांना वसुल करण्याची अट असल्याने विकासकांनी 90% भांडवली मूल्य भरलेले नव्हते. परंतु सन 2011 नंतर ज्या प्रकरणामध्ये प्रकल्प कालावधी संपुष्टात आला आहे अशा प्रकरणामध्ये संपूर्ण भांडवली मूल्य भरल्याशिवाय प्रकल्प कालावधी वाढवून न देण्याचा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42272...

श्री.उदय सामंत...

तसेच सन 2010 नंतर मंजूर पुनर्विकास प्रस्तावात भांडवली मुल्य 20% पुनर्विकास योजनेचे इरादापत्र निर्गमित करण्यापुर्वी 60% विक्री इमारतीच्या घटकास बांधकामाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी व उर्वरीत 20% विक्री इमारतीच्या घटकाच्या भोगवटा प्रमाणपत्रास ना-हरकत देण्यापुर्वी वसुल करण्याचा निर्णय महानगरपालिका आयुक्तांनी घेतला आहे.

(क) महापालिकेच्या प्रचलित धोरणाप्रमाणे सदर भांडवली मूल्य भरणा करण्यासाठी दिरंगाई केलेल्या विकासकांकडून 18% व्याज घेऊनच सदरच्या भांडवली मूल्यांची वसूली सुरु आहे.

(ड) सदर विकासकांना पुनर्वसन इमारती वगळून विक्री इमारतींचे काम थांबविण्याची नोटीस इमारत प्रस्ताव (शहर) या विभागामार्फत बजाविण्यात आलेली आहे व विक्री घटकाचे काम थांबविण्यात आलेले आहे.

(इ) त्याचबरोबर अशा विकासकांच्या कोणत्याही पुनर्विकास प्रकल्पांचे प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेकडे निधी नाही असे सातत्याने सांगितले जाते. परंतु मुंबईतील विकासकांकडे जवळपास 67 कोटी रुपयांची थकबाकी असताना मुंबई महानगरपालिका त्या विकासकांना पाठिशी का घालत आहे, विकासक आणि महानगरपालिका यांच्यामध्ये काही संगनमत आहे काय, विकासकांकडून थकबाकीची वसुली करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेला कालावधी ठरवून दिलेला आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मुंबई महानगरपालिके संदर्भातील प्रश्न मांडलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, विकासकाकडून विकास शुल्क आणि भांडवली शुल्क घेतले जाते. विकासकांनी विकास शुल्काची रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली आहे. त्या रकमेमध्ये कोणतीही तफावत नाही. माननीय सदस्यांनी या ठिकाणी 67 कोटी रुपयांच्या थकबाकीचा उल्लेख केला. आपण सात विकासकांना कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. माझ्याकडे त्या विकासकांची नावे आहेत. सात विकासकांना कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर त्यातील काही विकासक उच्च न्यायालयात गेले आहेत. उच्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42272...

श्री.उदय सामंत...

न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, ओ.सी.देईपर्यत विकासकाकडून पैसे वसूल करु नयेत. आपण त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जात आहोत. सर्वोच्च न्यायालयात जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, इम्प्रुव्हमेंट कमिटीमध्ये निर्णय झाल्याप्रमाणे विकासकाने प्रथम 20 टक्के रक्कम भरावी आणि ओ.सी. मिळाल्यानंतर 80 टक्के रक्कम भरावी. त्याप्रमाणे विकासने प्रथम 20 टक्के रक्कम भरलेली आहे. असा नियम असताना देखील आयुक्तांनी विकासकांना कारणे दाखवा नोटीस दिल्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत. सर्वोच्च न्यायालयात सुध्दा आपल्या विरोधात निकाल लागणार आहे कारण इम्प्रुव्हमेंट कमिटीने तसा ठराव केलेला आहे. माझा प्रश्न आहे की, शासनाने आतापर्यंत न्यायालयीन प्रक्रियेवर किती रुपये खर्च केले ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये विकासकांकडून किती वसुली थकीत आहे याची माहिती दिलेली आहे. ज्या विकासकांकडे थकबाकी आहे अशा विकासकांचे इतर प्रकल्प चालू असतील तर त्यावर निर्बंध आणून ते थांबविण्यात येतील काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, थकबाकीदार विकासकांची नावे सांगण्यात येतील काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, सात विकासकांनी पैसे भरलेले नाहीत. त्यांची नावे माझ्याकडे आहेत. माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पालन करणे शासनाचे कर्तव्य आहे. संतोष एन्टरप्रायजेस, क्रिसीसन बिल्डर, अबु एन्टरप्रायजेस, बीएमके एन्टरप्रायजेस, शखाला, हीट डेव्हलपर्स आणि ज्योतिंद्र बिल्डर्स या सात विकासकांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या होत्या. यातील एक विकासक उच्च न्यायालयात गेल्यामुळे ही सर्व प्रोसीजर थांबलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

अशासकीय प्रत / मुद्रणासाठी नाही

औरंगाबाद महानगरपालिकेने पाणीपट्टीचे दर वाढविल्याबाबत

(८) * ४२२४१ श्री.सतीश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.एम.एम.शेख, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विनायकराव मेटे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी पासून पाणी पट्टीचे दर वाढवून २७५० रुपये केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रकमेपैकी २५०० रुपये समांतर ठेकेदाराला व फक्त २५० रुपये महानगरपालिकेला मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील सर्व सामान्य नागरिकांचा विचार करता ही दरवाढ रद्द करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) दि.०१/०४/२०१३ पासून १/२" व्यासाच्या निवासी वापराच्या जोडणीसाठी रु.२७५०/- प्रतिवर्षी पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पाणीपुरवठा योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 1 ला "निवासी वापराच्या जोडणीसाठी रु.2750/- प्रतिवर्षी पाणीपट्टी आकारणी करण्यात येत आहे." आणि प्रश्न क्रमांक 2 ला "हे खरे नाही." अशी लेखी उत्तरे देण्यात आलेली आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, 2750/- रुपयांतील ठेकेदाराला किती रक्कम देण्यात येणार आहे आणि महापालिकेकडे किती रक्कम ठेवण्यात येणार आहे ? प्रश्न क्र.3 व 4 ला "पाणी पुरवठा योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे." असे लेखी उत्तर दिलेले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, महानगरपालिका ही जबाबदारी पूर्ण करु शकत नसेल तर सरकार यामध्ये हस्तक्षेप करणार काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनात सांगितले होते की, ही योजना रद्द करण्यात येईल. महोदय, या योजनेच्या ठेकेदाराने गेल्या 1 वर्षांपासून काम सुरु केले नाही. पूर्वी 700 कोटी रुपये किंमत असलेली योजना 1200 कोटी रुपयांवर गेली आहे. काही नेते आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने उच्च न्यायालयात या प्रकरणी केस दाखल केली. त्या ठिकाणी वकील सुध्दा मॅनेज झाले. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार हस्तक्षेप करुन ही योजना रद्द करणार का ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : महोदय, या प्रश्नामध्ये पाणीपट्टीचा उल्लेख आहे. महापालिकेने पाणीपट्टीमध्ये पहिल्यांदा 2003 मध्ये वाढ केली होती. त्यावेळी पाणीपट्टी 2500 रुपये होती. त्यानंतर महानगरपालिकेने असा ठराव केला की, दरवर्षी पाणीपट्टीमध्ये 10 टक्के वाढ करण्यात यावी. त्यानुसार दिनांक 1 एप्रिल, 2013 पासून 2750/- रुपये पाणीपट्टी आकारण्याचे ठरविले आहे. वाढलेल्या पाणीपट्टीबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. औरंगाबाद महानगरपालिकेचे 310 कोटी रुपये वीज देयकापोटी येणे बाकी होते. वन टाईम सेटलमेंटच्या माध्यमातून 100 कोटी रुपये भरल्यानंतर उर्वरित 210 कोटी रुपयांचे देयक महापालिकेला माफ करण्यात आले आहे.

तसेच समांतर जल वाहिनीचा प्रश्न हा वेगळा आहे. ज्या वेळी ही योजना कार्यान्वित होईल त्या वेळी ठेकेदाराला काम देऊन पाणीपट्टीच्या 2750/- रुपयांतील 1800/- रुपये ठेकेदाराला दिले जातील आणि उर्वरित महानगरपालिकेकडे जमा होतील. अद्यापपर्यंत समांतर जल वाहिनीचे काम सुरु झालेले नाही. त्यामुळे 2750/- रुपयांतील एकही पैसा ठेकेदाराला दिला जात नाही.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यातील अतिदुर्गम गावातील नागरिकांना रेशनकार्ड देण्यासाठी करावयाची कार्यवाही

(९) * ४१८२१ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.नागो पुंडलिक गाणार : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यातील अतिदुर्गम गावात हजारोंच्यावर नागरिकांकडे रेशनकार्ड नसल्याचे माहे एप्रिल, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे तेथील नागरिकांना स्वस्त धान्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नागरिकांना अद्यापही रेशनकार्ड न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या नागरिकांना तातडीने रेशनकार्ड देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख : (१), (२), (३), (४) व (५) भामरागड तालुक्यातील सद्य:स्थितीत ९६४ कुटूंबांकडे शिधापत्रिका नाहीत. ज्यांच्याकडे शिधापत्रिका नाहीत त्या कुटुंबांना शिधापत्रिका उपलब्ध करुन देण्यासाठी तहसिलदार भामरागड यांचे स्तरावरुन ऑगस्ट २०१२ ते जून २०१३ या कालावधीत ७३ राजस्व अभियान व जनजागरण मेळावे आयोजित करण्यात आले. त्यामध्ये फॉर्म क्रमांक १ भरुन देण्यास आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार भामरागड तालुक्यात ज्यांनी शिधापत्रिका करिता विहित नमुन्यातील अर्ज भरुन दिले त्यांना पात्रतेप्रमाणे १३५ शुभ्र शिधापत्रिका, १७२ केशरी शिधापत्रिका, ७६३ अंत्योदय दुय्यम शिधापत्रिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी गेल्या दोन वर्षांपासून भामरागड तालुक्यात लोकांना रेशन कार्ड मिळत नसल्याचा प्रश्न मांडत आहे. अद्यापपर्यंत त्या तालुक्यातील लोकांना रेशन कार्ड मिळालेली नाहीत. त्यांना रेशन कार्ड दिल्याचे सरकारकडून सांगितले जात आहे. परंतु मुळात ती रेशन कार्डे आदिवासींना न मिळता बाकीच्याच लोकांनी घेतलेली आहेत. त्यामुळे मूळ आदिवासीपर्यंत रेशन कार्ड पोहोचलेले नाही अशी माझी माहिती आहे. त्यामुळे बोगस आदिवासींनी घेतलेल्या रेशन कार्डबाबत फेरतपासणी करुन, भामरागड तालुक्यातील आदिवासींना नव्याने रेशन कार्ड देण्यात येतील काय ?

श्री.अनिल देशमुख : महोदय, भामरागड तालुक्यात 110 महसुली गावे आहेत. त्या तालुक्याची कुटुंब संख्या 6998 आहे. आजच्या घडीला 964 कुटुंबांकडे शिधापित्रका नाहीत. त्या भागात ऑगस्ट-2012 ते जून-2013 या कालावधीत 73 राजस्व अभियान राबविले होते. लोकांना विनंती केली होती की, त्यांनी फॉर्म क्रमांक-1 भरुन द्यावा. तरी सुध्दा तेथील लोकांना फॉर्म भरुन

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41821....

श्री.अनिल देशमुख....

दिले नाहीत. ज्यांनी फॉर्म भरुन दिले त्यांना शिधापत्रिका देण्यात आल्या. भामरागड तालुका दुर्गम आहे. म्हणून त्या तालुक्यात ज्या लोकांना शिधापत्रिका मिळाल्या नसतील त्यांच्यासाठी स्पेशल मोहीम राबवून वा राजस्व अभियान राबविण्यात येईल. त्यांनी फॉर्म क्रमांक-1 भरुन दिल्यानंतर जास्तीत जास्त लोकांना शिधापित्रका देण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, फॉर्म भरुन देण्यासाठी कार्यालयात जाण्याकरिता त्या भागात रस्ते नाहीत. ते लोक अज्ञानी असल्यामुळे फॉर्म भरु शकत नाही. मी दोन वर्षापूर्वी तेथील तहसीलदालांना भेटून सांगितले की, तुम्ही स्वत: या लोकांचे फॉर्म भरुन द्यावेत व त्यांना रेशन कार्ड पुरवावेत. त्यांनी गावांत जाण्याबाबत होकारार्थी उत्तर दिले. परंतु नंतर ते लोकांचे फॉर्म भरुन घेण्यासाठी गेले नाहीत. भामरागड तालुक्यात कोणीही जात नाही. अशी तेथील लोकांची अवस्था आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, भामरागड तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन तेथील लोकांना फॉर्म भरुन देण्याची व्यवस्था करुन त्यांना रेशन कार्ड देण्यात येतील काय ?

श्री.अनिल देशमुख : महोदय, प्रत्येक रेव्हेन्यू सर्कलच्या ठिकाणी शिबिरे घेण्यास सांगितले जाईल. तसेच त्या सर्कलमधील लोकांकडून फॉर्म क्रमांक-1 भरुन घेण्यास सांगितले जाईल.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

राज्यात सर्व शैक्षणिक साहित्यावरील जकात कर रद्द करणेबाबत

(१०) * ४१८८६ डॉ. अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर राज्यात सेवाभावी संस्था संचलित सर्वच शाळा-महाविद्यालये आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक प्रयोजनास्तव मागविण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा सामग्री, उपकरणे, फर्निचर इत्यादी सर्व साहित्यांवर जकात कर माफी देण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ६ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्व शैक्षणिक साहित्यावर जकात कर माफ करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, शैक्षणिक क्षेत्रास आर्थिकदृष्ट्या सहायताकारी सिद्ध होणाऱ्या यामागणीबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री. उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) राज्यातील मुंबई वगळता सर्व महानगरपालिकांमध्ये जकात रद्द करुन त्या ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याच्या अधिसूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे जकात रद्द करण्यात आल्यामुळे एखाद्या वस्तूवर जकातीमध्ये माफी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेने ज्या पध्दतीने पूर्वीच्या जकातीमध्ये किंवा आता एलबीटीमध्ये तो कर ट्रान्सफर करण्यात आला त्या एलबीटीमध्ये जी सबसिडी शैक्षणिक संस्थांना दिलेली आहे, जी काही सायन्स इक्विपमेंट्स असतील किंवा जे शैक्षणिक साहित्य विकत घेतले जाते त्यावर सबसिडी दिलेली आहे. त्याप्रमाणे राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये सबसिडी लागू करणार का ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, राज्यात मुंबई वगळता सर्व महानगरपालिकांना एलबीटी लागू करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेमध्ये सर्वच शैक्षणिक साहित्याला करमाफी करण्यात आलेली आहे, ते चुकीचे आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये फक्त पुस्तके, कंपास बॉक्स, कलर बॉक्स,पेन्सील शार्पनर या वस्तूंनाच करमाफी करण्यात आलेली आहे आणि ती महानगरपालिकेच्या प्रस्तावाप्रमाणे करण्यात आलेली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41866 .....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आज आपण 10 प्रश्नांपर्यंत पोहोचलो त्याबद्दल मी आपले आणि सभागृहाचे आभार व्यक्त करतो. आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, काही वस्तूंना सवलत आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. राज्यातील महानगरपालिकेच्या अंतर्गत जी शहरे येतात त्या शहरांमध्ये येणारे शाळांना आणि विद्यार्थ्यांना उपयोगी असणारे जे शैक्षणिक साहित्य असेल त्यांना एलबीटी करामध्ये सूट दिली पाहिजे. ती देण्याचा निर्णय शासन कधी घेणार आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, एलबीटीचे दर काय असावेत हे महानगरपालिकांनी ठरवावयाचे आहे. शासन त्यांना मान्यता देते परंतु तो अधिकार महानगरपालिकांचा आहे. यामध्ये कल्पना अशी आहे की, जकातीपेक्षा उत्पन्न कमी होऊ नये आणि व्यापारही वाढावा. त्यामुळे महानगरपालिकेचा काही प्रस्ताव आला तर शासन निश्चितपणे विचार करील.

श्री. निरंजर डावखरे : सभापती महोदय, मध्यंतरी महानगरपालिकेच्या अंतर्गत जेवढ्या शाळा आहेत त्या अनुदानित किंवा विनाअनुदानित असो, त्या सर्वांना एलबीटीच्या नोटिसेस पाठविलेल्या आहेत हे खरे आहे का ? शाळा या कमर्शियल जागा नाहीत. त्यामुळे त्यांना एलबीटी न लावण्याचा शासनाचा काही निर्णय आहे का ?

श्री. उदय सामंत : असा कोणताही निर्णय नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. आज माझ्याकडे दोन औचित्याचे मुद्दे आलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. संपूर्ण महाराष्ट्र अतिवृष्टीने झोडपला जात आहे. शेतकरी अत्यंत चिंतेमध्ये आहेत. महाराष्ट्रातील जवळजवळ 60 टक्के भागामध्ये अतिवृष्टीमध्ये संपूर्ण शेती धुवून गेलेली आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांवर तिबार पेरणीचे संकट आलेले आहे. मी माध्यमांना धन्यवाद देतो कारण आजच्या ज्या सगळ्या बातम्या आहेत त्यामधून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विविध अवस्था संपूर्ण महाराष्ट्रापर्यंत पोहोचत आहेत. मुंबई सुध्दा पावसाने झोडपली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. भागाभागामध्ये आमदारांना सुध्दा आपल्या भागातील शेतकऱ्यांची नक्की काय परिस्थिती आहे हे पाहण्याची संधी मिळत नाही. म्हणून माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, हे अधिवेशन 4 दिवसांकरिता संस्थगित करावे आणि पुढे 4 दिवस अधिवेशन वाढवावे.

हा विषय राजकीय नाही. या 4 दिवसांमध्ये या शेतकऱ्यांच्या नक्की वेदना समजून घेण्याकरिता, संकटात असलेल्या शेतकऱ्यांची नक्की काय परिस्थिती आहे हे समजून घेण्याची संधी सदस्यांना मिळाली तर त्या संदर्भातील चर्चा चांगल्या परिस्थितीमध्ये होईल. सरकार ओल्या दुष्काळाच्या संदर्भात काही निर्णय घेणार असेल तर सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भागातील व्यथा या ठिकाणी योग्य प्रकारे मांडल्यानंतर त्याला योग्य मार्गदर्शन मिळेळ अशा प्रकारची भूमिका मी स्वत:च फिरत असल्यामुळे मांडावीशी वाटते. म्हणून मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, अतिवृष्टीची परिस्थिती लक्षात घेता आपण तातडीने मंत्रिमंडळाची बैठक बोलवावी आणि हे अधिवेशन 4 दिवसानंतर ताबडतोब पुढे सुरु करावे. या 4 दिवसांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील परिस्थिती पहावी. सोमवार नंतर त्या संदर्भात जर धोरण मांडले आणि त्यामध्ये जर पुन्हा त्रुटी राहिल्या तर पुन्हा आपली आंदोलने चालू राहतात आणि शेतकरी वाऱ्यावर पडतो. अशी परिस्थिती होता कामा नये. म्हणून मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माननीय मुख्यमंत्री दौरा करतील, अधिकाऱ्यांच्या बैठका घेतील. त्या बैठकांमध्ये त्या त्या भागातील सदस्यांनी आपली बाजू मांडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना ती समजावून घेता येईल. त्यामुळे त्या भागातील प्रश्न सुटण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाने माझ्या सूचनेचा विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, तासगांव पलूस सहकारी साखर कारखान्याचे शेतकरी कालपासून आझाद मैदानावर धरणे धरुन बसलेले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी नवीन धोरण जाहीर केले आहे की, शेतकऱ्यांच्या मालकीचे जे कारखाने आहेत ते विकता येणार नाहीत. ते दीर्घ मुदतीने चालविण्यास द्यावयाचे आणि मुदत संपल्यानंतर पुन्हा शेतकऱ्यांच्या मालकीचे ठेवावयाचे. माननीय मुख्यमंत्र्यांनी हे चांगले धोरण स्वीकारलेले आहे. परंतु तासगांव पलूस सहकारी साखर कारखान्याने टेंडर न काढता 13 कोटी रुपयांना हा कारखाना विक्रीला काढण्याचा निर्णय घेतला होता. राज्य सहकारी बँकेमध्ये या निर्णयाला मी विरोध केला होता. या विक्रीबाबत केवळ वर्तमानपत्रात टेंडर नोटीस छापून त्या कारखान्याचे चेअरमन व आणखी दोन लोकप्रतिनिधींनी 13 कोटी रुपयांना विकून खाजगी बचत गटाच्या नावाने चालविण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला संचालक या नात्याने मी विरोध केला होता.

सभापती महोदय, एक बॉयलर विकत घेण्यासाठी 20-25 कोटी रुपये खर्च येतो. या साखर कारखान्याची 200 एकर जमीन आहे, 150-200 कोटी रुपयांची मालमत्ता आहे. असे असताना या साखर कारखान्याची विक्री करण्याचे धोरण संचालक मंडळ घेत आहे किंवा राज्य सहकारी बँक घेत आहे हे चुकीचे आहे. हा कारखाना चालविण्यासाठी पुन्हा टेंडर काढण्यात आले. ज्यांनी हा कारखाना विकत घेण्याचे सुरुवातीपासून प्रयत्न केले होते त्यांनी 6 कोटी रुपयांचे टेंडर भरले आणि दुसऱ्या एक व्यक्तीने एका वर्षासाठी 10 कोटी रुपयांचे टेंडर भरले आहे. 4 वर्षामध्ये 40 कोटी रुपयात हा कारखाना क्लिअर होऊ शकतो. या राज्यातील नेते प्रा.एन.डी.पाटील व शेतकरी या प्रश्नासाठी आझाद मैदानावर धरणे धरुन बसलेले आहेत. हा कारखाना विकण्यासाठी राज्य सहकारी बँकेला शासनाने परवानगी देऊ नये, त्या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. राज्यातील सर्व सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे राहतील व काही वर्षांनंतर ते शेतकऱ्यांना चालविण्यासाठी दिले जातील. या कारखान्याबाबत ते धोरण स्वीकारणार काय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या नवीन धोरणानुसार सभागृहाला आश्वासन देऊन त्या शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन संपविण्याची विनंती केली जाईल काय ?

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझ्याकडेही या संदर्भातील निवेदन प्राप्त झालेले आहे. या राज्याचे ज्येष्ठ नेते प्रा.एन.डी.पाटील आणि 200-250 शेतकरी आझाद मैदानावर काल पासून उपोषणाला बसले आहेत. आज दुपारी 1.00 वाजता मी त्यांच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलविलेले आहे. त्यावेळी आपणही यावे. मी विभागाच्या सचिवांना आणि बँकेचे अधिकाऱ्यांना बोलविलेले आहे. बँकेने घेतलेला काय निर्णय आहे, डीआरटीमध्ये काय निर्णय झालेला आहे आणि आता एक वर्षासाठी टेंडर काढण्यात आलेले आहे यासंबंधी त्यांची भूमिका काय आहे ते जाणून घेता येईल. त्याबाबत त्यांच्या ज्या भावना आहेत त्या समजावून घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन नंतर सरकारची पुढील भूमिका स्पष्ट केली जाईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सहकारी साखर कारखान्याच्या विक्रीचा विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे. शासनाने या संदर्भात अत्यंत महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. विदर्भात 16 सहकारी साखर कारखाने होते. त्यापैकी 8 साखर कारखाने राज्य सहकारी बँकेने विकलेले आहेत. त्याशिवाय जवळजवळ 6-7 कारखाने विक्रीसाठी काढलेले आहेत. विदर्भातील 16 च्या 16 साखर कारखान्यांची विक्री केल्यामुळे व मागील निर्णयामुळे विदर्भातील सहकार क्षेत्र उद्ध्वस्त झालेले आहे. त्यामुळे शासनाने या धोरणात बदल करण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील एकही सहकारी साखर कारखाना खाजगी मालकाच्या ताब्यात जाऊ नये यासाठी शासन स्पष्ट निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी उपस्थित केलेला मुद्दा रास्त आहे. ही गोष्ट खरी आहे की, राज्य सहकारी बँकने जवळ जवळ 11 सहकारी साखर कारखाने ऑक्शनने दिलेले आहेत. ते खाजगीला दिलेले आहेत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना केलेली आहे की, या पुढच्या काळामध्ये साखर कारखाने लिलावामध्ये न काढता शेजारचा कारखाना लॉंग लिजर घेण्यास तयार असेल तर तशा प्रकारचा प्रस्ताव तयार करावा. विदर्भातील दोन तीन कार्यक्रमामध्ये ही भूमिका स्पष्ट करण्यात आली. विदर्भामध्ये सहकार वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाला निश्चितपणे वेगळा विचार करावा लागेल. सन्माननीय सदस्यांनी 8 सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला. त्याबाबतीत काय मार्ग काढता येईल यासंबंधीची भूमिका विभाग निश्चितपणे घेईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एका गंभीर घटनेकडे मी या सभागृहाचे लक्ष वेधित आहे.

सभापती महोदय, काल दिनांक 23 जुलै 2013 रोजी परळ येथील हॉटेल अदिती समोर काही लोकांनी निदर्शने करुन हॉटेल बंद पाडण्याचा प्रकार हे अधिवेशन चालू असताना घडला. त्या हॉटेलच्या मालकाने बिलावर केन्द्र सरकारच्या काही विषयाच्या संदर्भात एक संदेश लिहिला होता. म्हणून त्या हॉटेलवर कॉग्रेसच्या कार्यकर्त्यांनी धुडगूस घालून, मारामारी करुन हॉटेल बंद पाडले. स्वत:ची मते मांडणे हा जर या शहरामध्ये गुन्हा होत असेल तर अतिशय वाईट परिस्थिती आहे. अमूल बटर्सवाले बॅनर लावतात. ते कोणत्याही सरकारच्या विरोधात किंवा कोणत्याही पार्टीच्या विरोधात लिहितात . उद्या ते बॅनर्स तोडले जातील. नाना चुडासामा सारख्या संस्थेतर्फे बॅनर्स डिस्प्ले केले जातात, ते बॅनर्स तोडले जातील. कार्टूनने संदेश दिला गेला म्हणून या सरकारने पोलिसांवर केसेस दाखल केल्या, स्व. बाळासाहेब ठाकरेच्या संदर्भात फेसबुकावर मत व्यक्त केल्याबद्दल त्या मुलीवरची केस मागे घेतली आणि पोलिसांवर गुन्हा दाखल केला. अशा पध्दतीने केवळ संदेश लिहिला म्हणून धुडगूस घातला जाणे, मारामारी केली जाणे हे योग्य नाही. अशा घटनेकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे. किंबहुना क्रिमिनल केसेस दाखल केल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझे सहकारी मित्र ॲड. आशिष शेलार यांनी राजकीय विश्लेषण केले. या सार्वभौम सभागृहाच्या व्यासपीठाचा वापर मी राजकीय चर्चेसाठी करु इच्छित नाही. परंतु एक खुलासा करु इच्छितो की, त्या ठिकाणी झालेले आंदोलन हे अतिशय शांतपणे झ ाले. जर चुकीची बाजू मांडली गेली तर त्या हॉटेलवाल्याच्या विरुध्द मत व्यक्त करण्याचे अधिकार आमच्या कार्यकर्त्यांना देखील आहेत. त्यांनी शांतपणे आंदोलन केले. त्यांनी कोणताही धुडगूस घातला नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी जो काही आरोप केलेला आहे तो चुकीचा असल्यामुळे तो कार्यवृत्तातून काढून टाकावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला सांगितले पाहिजे की, ज्या पध्दतीने हॉटेल मालकाने बिलावर संदेश लिहिला तो चुकीचा आहे. खरे म्हणजे बिल ही शासनाची किंवा ग्राहकाची प्रॉपर्टी असते, ती हॉटेल मालकाची प्रॉपर्टी होऊ शकत नाही. अशा प्रकारे बिलावर संदेश लिहिणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

कायद्यामध्ये बसत नाही. कारण बिलावर राज्य शासन, टॅक्स लावणारे आणि ग्राहक यांचा अधिकार आहे. बिलावर जर ग्राहकाचा आणि राज्य शासनाचा अधिकार असेल तर हॉटेल मालक बिलावर मनमानी करुन काहीही लिहू शकत नाही. त्यामुळे या हॉटेल मालकावर कायदेशीर कारवाई करण्याची भूमिका राज्य शासन घेईल का ? तसेच अशा प्रकारचे कृत्य यापुढे कोणाकडूनही घडू नये, कोणत्याही बिलावर काहीही लिहिले जाऊ नये अशा प्रकारचा संदेश जाण्यासाठी या हॉटेलच्या मालकारवर शासनाने कायदेशीर कारवाई केली पाहिजे.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

महोदय, युथ कॉग्रेसचे कोणीही कार्यकर्ते आतमध्ये गेले नाहीत. शिवसेना, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या कार्यकर्त्यांसारखा धुडगुस कधीही कॉग्रेसचे कार्यकर्ते घालत नाहीत. युथ कॉग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारचा धुडगुस घातलेला नाही. चुकीच्या पध्दतीने कॉग्रेस पक्षाची प्रतिमा खराब करण्याचे काम विरोधी पक्षाकडून केले जात आहे. ते निषेधार्ह आहे. त्या हॉटेल मालकावर राज्य शासन कारवाई करील काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे एका पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी दुसऱ्या पक्षांचा उल्लेख करताना जे वक्तव्य केलेले आहे, ते सभागृहाच्या पटलातून काढून टाकले पाहिजे. हॉटेल मालकाने बिलाच्या अनुषंगाने त्यांनी आपले मत मांडले आहे. त्यांचा अभ्यास आहे, त्या अनुषंगाने त्यांनी आपले मत या ठिकाणी व्यक्त केलेले आहे. या बाबतीत खरे काय आहे आणि खोटे काय आहे ते नंतर कळेलच.

श्री.माणिकराव ठाकरे : कोणताही हॉटेल मालक आपल्या बिलावर मत व्यक्त करु शकत नाही. राज्य शासनाकडून टॅक्स लावला जातो, त्याचा उल्ले्ख हॉटेलच्या बिलात केला जातो. ग्राहकांना किती टॅक्स लावला गेला आहे याची माहिती मिळालीच पाहिजे. परंतु अशा प्रकारे हॉटेल मालक कृत्य करीत असेल तर यापुढे बिलावर खोडाखोड करण्याची कोणी हिंमत कोणी करु नये म्हणून सदर हॉटेल मालकाला शासन झाले पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, कॉग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आहे. तुमच्या पक्षाच्या कार्यकत्यांनी काही चुकीचे केले असेल तर त्यांचे विरुध्द कारवाई करा, त्यांनी काही चूक केली नसेल तर कारवाई करु नका. या ठिकाणी चूक कोणाची आहे ही बाब काही दिवसात स्पष्ट होईल. आम्ही पक्षाचा उल्लेख करुन काहीही बोललेलो नाही. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, आपल्या मुलांनी चुकीचे केले असेल तर त्यासंबंधी राग येऊ शकतो. परंतु अशा वेळी मोठयांनी संयमाने वागले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी वेगवेगळया पक्षांच्या संदर्भात जे वक्तव्य केलेले आहे, ते रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावे अशी आमची आग्रही मागणी आहे. यांनी काहीही करावयाचे आणि लोकांनी काही बोलावयाचे नाही, अशा प्रकारची मुस्कटदाबी सहन केली जाणार नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी कायदेशीर मुद्दा उपस्थित केला. असे प्रकार भविष्यामध्ये कोणाकडूनही घडू नयेत म्हणून शासनाने संबंधिता विरुध्द कारवाई करावी अशा प्रकारची विनंती मी शासनाला केलेली आहे. बील घेणे हा ग्राहकाचा अधिकार आहे. बिलात कोणकोणत्या प्रकारचे टॅक्सेस लावले जातात याची ग्राहक माहिती घेऊ शकतात. हॉटेल मालकानी ग्राहकांना टॅक्सेस लावून बील दिले पाहिजे. ग्राहकांना बील देण्यात यावे यासाठी शासनाने हॉटेल मालकांवर सक्ती केलेली आहे. खाजगी मालकांचा त्या बिलावर काहीही अधिकार असू शकत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे उपस्थित आहेत. त्यांना याबाबतीत आपण विचारु शकता.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आमच्या पक्षाच्या माननीय अध्यक्षांनी या सभागृहात वस्तुस्थिती सांगितली आहे. राजकीय वक्तव्ये केलेली नाहीत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी "मी उल्लेख केल्यानंतर मिडिया बघत नाही काय" असे वक्तव्य केलेले आहे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा आदर करतो. मी एक गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मिडियाने सुध्दा त्यांच्या पक्षाच्या बाबतीत काय भूमिका घेतलेली आहे ही गोष्ट सर्वांना ज्ञात आहे. त्यामुळे त्यांनी आमच्याकडे बोट दाखवू नये.

(गोंधळ)

सभापती : या ठिकाणी औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने चर्चा पुढे लांबत गेल्यानंतर काय होते अशा पध्दतीचा हा विषय आहे असे मला वाटते. मी सरकारला अशी सूचना देतो की, या बाबतीत कायदेशीर बाजू आपण तपासून बघावी. यापेक्षा जास्त सूचना देणे मला योग्य वाटत नाही. दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून या विषयाच्या बाबतीत आपापली मते मांडण्याचा प्रयत्न केला गेला. मी त्या बाबतीतील आशय तपासून घेईन. जे अयोग्य असेल ते रेकॉर्डमधून वगळण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगू इच्छितो की, सरकारने जे काही लिहिले आहे त्याची तपासणी करावी अशी मी सूचना दिलेली असल्यामुळे तो एक विषय बाजूला झाला आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

या ठिकाणी दुसरी चर्चा जी झाली ती दोन्ही बाजूकडून झाली आहे. या ठिकाणी पक्षाबद्दल जे काही भाष्य झाले ते दोन्ही बाजूकडून झाले आहे. ते वक्तव्य मी तपासून घेतो आणि त्यानंतर मी माझा निर्णय देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, भाजप, सेना, मनसे हे राजकीय पक्ष धुडगूस घालतात हे माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी केलेले वक्तव्य आपल्याला मान्य आहे का?

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सभापती : मला सभागृहात केले गेलेले वक्तव्य योग्य वाटले नाही म्हणूनच मी ते तपासून घेतो असे सांगितले आहे. ते वक्तव्य तपासून घेतल्यानंतर जर ते अयोग्य असेल तर पटलावरुन काढले जाईल.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, रेकॉर्ड तपासून घेण्यासाठी आपण सभागृहाची बैठक पाच मिनिटाकरिता तहकूब करावी. अन्यथा हे वक्तव्य उद्या वृत्तपत्रात प्रसिध्द होऊ शकते.

सभापती : खरे पाहता औचित्याचा मुद्दा मांडावयास परवानगी द्यायची की नाही हे कटाक्षाने ठरविले पाहिजे. माननीय सदस्य दररोज औचित्याचे मुद्दे देत असतात त्यांना मी सभागृहात मुद्दा मांडण्यास नक्की अनुमती देतो. असे असताना एखाद्या विषयामुळे सभागृहातील वातावरण दूषित होणार असेल तर औचित्याच्या मुद्याबाबत मला कठोर भूमिका घ्यावी लागेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे हेच आहे की, भाजप-सेना-मनसे हे राजकीय पक्ष धुडगूस घालतात हे वक्तव्य आपल्याला पटते का एवढे सांगावे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी औचित्याचा मुद्दा मांडत असताना जे काही भाष्य केले त्यात धुडगूस हा शब्द उच्चारला आहे. त्यानंतर मी वक्तव्य केले की, कधी मॉलवर, कधी टॅक्सीवर यांनी काय काय केले हे संपूर्ण जगाला माहिती आहे, ते लपून राहिलेले नाही. यांनी ते केले असेल तर यांना ऐकून घ्यायला काय हरकत आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मुद्दा डेव्हलप करण्याचा प्रयत्न केला त्यावेळेला त्यांनी काँग्रेस पक्षाबाबत आपले जे काही मत असेल, भाष्य असेल ते उद्धृत केलेले आहे. म्हणून माझे म्हणणे आहे की, माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, माननीय सदस्य श्री.संजय दत्त आणि माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जे काही भाष्य केलेले आहे ते सर्व मी तपासून घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे जे काही बोलले तेवढ्यापुरती आम्ही हरकत घेतलेली आहे.

सभापती : तुमचे जरी तसे मत असले तरी माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्या वक्तव्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या अनुषंगाने काही शब्द आले त्यापासून तो विषय पुढे सुरु झाला.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे जे काही बोलले ते आपल्याला पटते का हे सांगावे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार जे काही बोलले ते आपण जरुर तपासावे. परंतु माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे वक्तव्य आपल्याला पटते का?

सभापती : मी माझा याबाबतचा निर्णय उद्या देईन.

श्री.दिवाकर रावते : आम्ही धुडगूस घालणारे आहोत असे आपले म्हणणे असेल तर आम्ही धुडगूसच घालतो...(गोंधळ)..

सभापती : मी या बाबतचा माझा निर्णय उद्या देतो.

नंतर आर.1..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण जो उद्या निर्णय देणार आहात तो उद्या न देता आजच द्यावा अशी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. आज निर्णय दिला जाईल. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे तसेच सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या वक्तव्यामध्ये जो आक्षेपार्ह भाग आलेला आहे. तो सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात येत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : माझ्याकडे आज रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्यासंदर्भातील माझे निर्णय अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव :सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " खामगांव, जि.बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात पुरेशा आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णाची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "कोल्हापूर जिल्हयातील गोकूळ दूध संघामार्फत पशुखाद्याच्या दात वाढ करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार,सर्वश्री विनोद तावडे, विजय(भाई) गिरकर, चंद्रकांत पाटील यांनी "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ(एमआयडीसी)संचालित जल शुध्दीकरण केंद्रामध्ये पाणी शुध्द करण्यासाठी टाकल्या जाणाऱ्या मातीमध्ये विषारी घटक असल्यामुळे या मातीची तपासणी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई शहरातील सांताक्रुझ(प)येथील एस.व्ही.रोड वरील आवश्यक नसलेला नवीन यु-टर्न बंद करणे बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "मौजे पोयसर, गायत्री नगर सह. गृह.निर्माण संस्था, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली(पूर्व) मुंबई येथील झोपडीधारकांच्या झोपडया रस्त्यामध्ये बाधित होत असून तेथे बोगस एसआरए योजना राबविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त सचिव...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार,सर्वश्री चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "मौजे पहाडी गोरेगाव (ता.बोरिवली) येथील विकासक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी संगनमत करुन शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडवून केलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वाढलेल्या उत्पन्न मर्यादेबाबत शासनाने अद्यापि निर्णय घेतलेला नसल्यामुळे हजारो विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सभापती : नियम 93 ची सहा निवेदने आहेत ती आज न घेता उद्या घेण्यात येतील. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेत ज्या लक्षवेधी सूचना दर्शवण्यात आलेल्या आहेत त्या उद्या सकाळी 10 ते 12 या दरम्यानच्या 5 लक्षवेधी सूचना घेतल्या जातील. आजच्या कामाकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेला सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव उद्या घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहराच्या चौकशीबाबत राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम

मु.शी.: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहराच्या चौकशीबाबत राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम या विषयावर सर्वश्री.विनोद तावडे,दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम,जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव.

सभापती :हा प्रस्ताव 2 तास 30 मिनिटात पूर्ण करावयाचा असून त्या पैकी पाऊण तास सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी असेल व राहिलेला संपूर्ण वेळ दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांसाठी असणार आहे. सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा लक्षात ठेवावी अशी विनंती आहे. जर विनियोजन विधेयक विधानसभेतून पास होऊन आले तर प्रस्तावावरील चर्चा खंडीत करुन विनियोजन बिल पास करावे लागेल. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्तावाला सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे(विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाचे विविध घोटाळे पुराव्यानिशी सभागृहात मांडूनदेखील त्याबाबत साधी चौकशी करण्याची बाबदेखील शासनाकडून मान्य करण्यात न येणे, सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार मान्य न करता घोटाळयाची रंगसफेदी करणारी श्वेतपत्रिका शासनाकडून काढण्यात येणे, वस्तुस्थितीवर आधारित श्वेतपत्रिका नसल्याने हिवाळी अधिवेशन, 2012 मध्ये सलग 5 दिवस विरोधी पक्षाने सभागृहात आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संपूर्ण घोटाळयाची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे, सदर एस.आय.टी. ची स्थापना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत असावी व एस.आय.टी. च्या कार्यकक्षेमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा याबाबतचे पत्र मा.मुख्यमंत्री महोदयांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांच्यामार्फत देण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र एस.आय.टी. स्थापन करताना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत समितीची स्थापना करण्यात न येणे, समितीच्या अध्यक्षांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी सिंचन घोटाळयाची काही कागदपत्र तपासाकरिता सादर करण्याबाबत पत्र दिले असता समिती अध्यक्ष श्री.चितळे यांनी समितीला तसा अधिकार नसल्याचे प्रतिपादन करणे, ही बाब लक्षात घेवून सिंचनातील भ्रष्टाचार बाहेर पडण्यासाठी श्री.चितळे यांनी सर्व प्रकारच्या तक्रारी चौकशी करण्याची मागणी तसेच एस.आय.टी. ची कार्यकक्षा बदलण्याची मागणी सभागृहात करणे, परंतु शासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, शासनाकडून याबाबत सकारात्मक प्रतिसाद न

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

मिळाल्याने सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत शासनाच्या भूमिकेबाबत कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी एस.आय.टी.च्या कार्यकक्षेत व रचनेत बदल करण्याची आवश्यकता, विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, विनंती एवढीच आहे की, ही चर्चा आज दुपारी 12.00 वाजता सुरु होणार होती परंतु ही चर्चा आता 12.30 वाजता सुरु होत आहे. त्यामुळे ही चर्चा 3.30 तास करावी अशी विनंती आहे.

सभापती :या चर्चेसाठी 3 तासांचा वेळ देण्यात येत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये सिंचनाच्या विषयी आम्ही प्रस्ताव मांडलेला आहे. त्या चर्चेला मी आता सुरूवात करीत आहे. मघाशी कोणी तरी माननीय सभापतींना म्हटले की, गंजलेली तलवार काढलेली आहे व त्याने आता लढाईला सुरूवात केली आहे. गंजलेल्या तलवारीमुळे सेप्टीक होते. त्याने जीव जातो की, इन्प्युटमेंट होते एवढे लक्षात ठेवलेले बरे.

सभापती महोदय, खरे म्हणजे सिंचना विषयी आम्ही सभागृहात वारंवार चर्चा उपस्थित करतो. दुर्दैवाने जे मुद्दे आम्ही सभागृहात मांडतो किंवा मांडले आहेत ते सरकारने बहुमताच्या जोरावर किंवा सत्तेच्या मस्तीच्या आधारे फेटाळून लावले असले तरी आम्ही जे मुद्दे येथे मांडले होते तेच मुद्दे न्यायालयात उचलून धरले गेले.

अधिवेशनामध्ये सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनी जनतेचे प्रश्न उपस्थित करून चर्चेद्वारे जनतेच्या प्रश्नाला न्याय मिळवून द्यावा अशी तात्त्विक चर्चा केली जाते. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला शासनाकडून चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. अधिवेशनामध्ये कोणते मुद्दे घ्यायचे यावर चर्चा करून अधिवेशनात काम करण्यासंबंधी सत्ताधारी विरोधकांना चहापान कार्यक्रमाच्या वेळी आश्वस्त करीत असतो. आम्ही येथे मांडलेले मुद्दे शासन ग्राह्य धरत नाही. आमचे मुद्दे कोर्टाने ग्राह्य धरल्यानंतर सुद्धा त्यासंबंधात सत्ताधाऱ्यांकडून एक भूमिका अपेक्षित असते. पण ती भूमिका शासनाकडून घेतली जात नाही.

या विधान मंडळाच्या पवित्र सभागृहामध्ये आपण नुकतीच स्व.यशवतंराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी केली. स्व.यशवंतराव चव्हाण यांची अनेक वक्तव्ये वर्षभरात भाषणामध्ये वापरली आहेत. स्व.यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणायचे की, विरोधक आणि सत्ताधारी ही दोन सत्तेच्या रथाची चाके आहेत. हे वक्तव्य आपण गेले वर्षभर भाषणात वापरत होतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आम्ही विरोधक या नात्याने अनेक मुद्दे मांडले आहेत. नियम 93 अन्वयेच्या सूचना असतील, लक्षवेधी सूचना असतील त्यास शासनाकडून फक्त आश्वासन दिले जाते. त्यामुळेच शिक्षक मतदार संघातील सन्माननीय सदस्य शिक्षकांच्या प्रश्नांबद्दल दरवर्षी शासनाची उजळणी घेत असतात. या सभागृहाला उच्च परंपरा आहेत. पण गेल्या काही वर्षापासून त्यात खंड पडलेला आहे. सभागृहात दिलेले आश्वासन ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे, अशा प्रकारे सभागृहाच्या आश्वासनाकडे पाहिले जात होते. पण गेल्या काही वर्षामध्ये या सगळ्यांवर बोळा फिरविण्याचे काम सत्ताधारी पक्षाकडून होत आहे.

सभागृहात सिंचनाच्या भ्रष्टाचारावर चर्चा सुरू झाली तेव्हा श्वेतपत्रिकेची घोषणा करण्यात आली.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

श्वेतपत्रिकेची घोषणा करण्यात आल्यानंतर यातून काही सत्य बाहेर येईल असे आम्हाला वाटले होते. कारण आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. युतीच्या काळात श्वेतपत्रिकेची मागणी करण्यात आली होती. युती शासनाने श्वेतपत्रिका काढल्यानंतर त्यातील फॅक्च्युअल बाहेर आले. श्वेतपत्रिका काढल्यानंतर जलसंपदा विभागातील भ्रष्टाचार, कामाची स्थिती, कामामध्ये काय गोंधळ झाला, कोणी कुठे लूट केली या सर्व बाबींची माहिती बाहेर येईल असे आम्हाला वाटले होते. परंतु तशी कोणतीही माहिती बाहेर आली नाही. ती श्वेतपत्रिका म्हणजे रंगसफेदी होती. तेव्हा आम्ही एस.आय.टी.ची मागणी केली. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट खाली एस.आय.टी.ची स्थापन करण्यात येईल असे नागपूरच्या अधिवेशनात सांगितले. त्याप्रमाणे एस.आय.टी.ची स्थापना झाली. परंतु त्या एस.आय.टी.ची काय अवस्था आहे हे आपण सर्वजण पाहत आहोत.

सभापती महोदय, शासनाने माधवराव चितळे समिती नेमली. त्या समितीला मी पत्र लिहिले की, "सिंचन घोटाळ्या संदर्भात मी सभागृहात भाषण केले आहे. भ्रष्टाचाराचे पुरावे दिले आहेत. कामांमध्ये काय गोधळ झाला याची माहिती दिलेली आहे. तेव्हा ही सर्व माहिती घेऊन आपणास भेटायचे आहे आणि गरज पडली तर माझे वकील या विषयातील मांडणी करतील, तपासणी करतील. तेव्हा मला समितीसमोर हजर राहण्यासाठी परवानगी द्यावी." त्यावर मला माधवराव चितळे समितीचे पत्र आले की, शासनाने मला ज्या कार्यकक्षा दिलेल्या आहेत त्यातील अनुच्छेद 3 प्रमाणे मला केवळ पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तपासणी करायची आहे." ही माहिती कोण देणार ? ज्यांनी घोटाळे केले त्यांनीच माहिती द्यायची आणि त्या आधारे अभ्यास करुन माहिती काढायची. आम्ही जे आरोप केले, सभागृहात जे पुरावे दिले, ज्या गोष्टी मांडल्या त्या संदर्भात माधवराव चितळे समितीने चौकशी करावी असे अपेक्षित होते. ते त्यांनी करायचे नाही. म्हणजे शासन देईल तेवढ्या कागदपत्रांची तपासणी करायची आणि त्यामध्ये काही नाही असे सांगायचे आणि रिपोर्ट आला असे सांगायचे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

सभापती महोदय, कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्टच्या 52 अंतर्गत ही समिती नेमली पाहिजे आणि त्यासाठी शासनाने कोणाताही पुढाकार घेतलेला नाही. त्यामुळे आम्हाला उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय राहिला...

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट प्रोसिजरचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सिंचनाच्या प्रस्तावावर बोलताना न्यायालयाचा आणि समितीचा उल्लेख केला. मागील अधिवेशनात तसेच त्या अगोदरच्या अधिवेशनात देखील या विषयावर चर्चा झालेली आहे आणि त्या संदर्भात समिती गठीत केलेली आहे. हा विषयाच्या संदर्भात न्यायालयात जनहित याचिका दाखल झालेली आहे. तेव्हा सभागृहात या विषयावर चर्चा करता येईल काय ? ज्या पध्दतीने चर्चा होणे अपेक्षित आहे त्या पध्दतीने चर्चा न करता माननीय विरोधी पक्षनेते न्यायालयाचा आणि समितीचा संदर्भ देत आहेत. त्यामुळे न्यायालयाच्या कामकाजात हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे तसेच समितीवर देखील दबाव येण्याची शक्यता आहे. तेव्हा माननीय विरोधी पक्ष नेत्यांना या प्रस्तावावर बोलता येणार नाही. तेव्हा आपण हा प्रस्ताव रद्द करावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L. A. BILL NO. XXVIII OF 2013

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2014.)

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 28, दिनांक 31 मार्च, 2014 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुनी त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उप सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम

मु.शी.: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम □ाऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझ्याकडे जनहित याचिकेची प्रत आहे. त्यामध्ये कोणते मुद्दे आहेत हे आपण पहावे. महोदय, या प्रस्तावामध्ये "5 दिवस विरोधी पक्षाने सभागृहात आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संपूर्ण घोटाळ्याची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे" असे नमूद केले आहे. यानंतर काही लोक न्यायालयात गेले आहेत. याच विषयीचा प्रस्ताव तीन-चार दिवसांपूर्वी कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आला होता. त्यावेळी त्यात माननीय राज्यपालांकडे चर्चा सुरु आहे, न्यायालयात जनहित याचिका दाखल झालेली आहे, त्या संदर्भात अमुक निर्देश देण्यात आलेले आहेत असे मुद्दे नमूद केले होते. परंतु आजचा प्रस्ताव सुध्दा पूर्वीसारखाच आहे. आजच्या प्रस्तावातील विषय आणि आशय पूर्वीचाच आहे. अगोदरच्या प्रस्तावाच्या विषयातील केवळ दोन-तीन शब्द वगळलेले आहेत. परंतु प्रस्तावातील विषय आणि संदर्भ तोच आहे. याचाच अर्थ विरोधी पक्षाला पूर्वीच्या प्रस्तावातील विषयावरच चर्चा घडवून आणावयाची आहे. माझ्याकडे जनहित याचिकेची प्रत आहे. आपल्याला हवी असल्यास ती देण्यास मी तयार आहे. माझी विनंती आहे की, अशा प्रकारच्या प्रस्तावावर संकेताच्या विरोधात जाऊन चर्चा होता कामा नये. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा होऊ देऊ नये अशी माझी विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षातील सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, हा प्रस्ताव चर्चेला घेण्याबाबत माननीय सभापतींनी संमती दिलेली आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे यामध्ये कायदेशीर बाजू असतील तर सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेताना कोर्टाचे उल्लेख टाळावेत.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, एस.आय.टी.च्या स्थापनेबाबत या प्रस्तावामध्ये मूळ हरकत घेण्यात आलेली आहे. एस.आय.टी.ची. स्थापना कॉन्स्टीटयुशनच्या आधारे झालेली असताना सुध्दा त्यावर त्यांची हरकत आहे. त्यामुळे या बाबीवर कशी चर्चा करता येईल ? विरोधी पक्षाला आपण अहवालावर चर्चा करु द्यावी.

श्री.रमेश शेंडगे : महोदय, या सभागृहाची गरिमा आणि प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे.

उप सभापती : मी पुन्हा एकदा सांगतो की, या प्रस्तावावर बोलताना सन्माननीय सदस्यांनी न्यायप्रविष्ट बाबींचा उल्लेख करु नये. "It is a well-established rule that discussion on a matter which is sub-judice is out of order and it has been held that the matter is not sub-judice until legal proceedings have actually started. The question whether a particular matter is sub-judice is decided by the Speaker on the merits of each case." त्यामुळे या बाबींचा विचार करुन माननीय सभापतींनी हा प्रस्ताव दाखल करुन घेतला आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर बोलताना न्यायप्रविष्ट बाबींचा उल्लेख करु नये.

(सत्ताधारी पक्षातील सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विनोद तावडे : भ्रष्टाचार बाहेर निघेल म्हणून तुम्ही घाबरता काय ?

श्री.रमेश शेंडगे : महोदय, जनहित याचिकेतील मुद्दे आणि या प्रस्तावातील मुद्दे आपण तपासून बघावेत.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी काही मुद्दे मांडले. त्यांच्याकडे पुरावे आहेत. जी जनहित याचिका दाखल झाली त्याची कागदपत्रे त्यांच्याकडे आहेत. माझी एक विनंती आहे की, आपण या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे मत घ्यावे आणि उद्या हा प्रस्ताव आणावा. सन्माननीय सदस्य उद्या या प्रस्तावावर बोलतील. त्यामध्ये काय अडचण आहे ?

उप सभापती : तुम्ही हे सभागृह चालविण्यासाठी सुध्दा ॲडव्होकेट जनरल यांना बोलवाल. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण पुढे सुरु करावे. कृपया आपण प्रस्तावाच्या मर्यादेतच बोलावे. कार्यकक्षा ठरलेल्या आहेत त्यानुसार आपण बोलावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी नेहमी चौकटीतच बोलतो. सन्माननीय सदस्यांचे संताजी-धनाजी सारखे झालेले आहे. सर्व घाबरावयास लागले आहेत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण या प्रस्तावाच्या संदर्भात गंभीर दिसत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी जो उल्लेख करीत होतो त्यामध्ये माझ या भाषणातून, माझ्या बोलण्यातून न्यायालयाच्या प्रक्रियेवर कोणताही दबाव उत्पन्न व्हावा असा उद्देश नसून न्यायालयाने जे म्हटले आहे त्याचा आपल्या चर्चेला उपयोग व्हावा यासाठी मी ते मांडत आहे. माननीच उच्च न्यायालयाने परिच्छेद 4 मध्ये माझ्या नावाचा विरोधी पक्ष नेता असा उल्लेख करत ज्या गोष्टी म्हटलेल्या आहेत त्याचा उल्लेख मी या ठिकाणी करीत आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "....Mr. Vinod Tawade, Leader of Opposition in the Maharashtra Vidhan Parishad addressed a letter dated 27th February, 2013 to the Chairman of the above Committee indicating that he was desirous of submittting certain material before the Committee regarding the irregularities in the implementation of the irrigation projects." त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "By letter dated 28th February, 2013, the Chairman of the Committee informed Mr. Tawade that the terms of reference do not include any enquiry

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

into the charges."

त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "...we find considerable substance in the submission of the Learned Counsel for the Petitioner that the allegations of irregularities and misappropriation referred to by the Petitioners in this Petition should be also examined by the Committee." त्यांनी जे म्हटले आहे त्याचा मी उल्लेख करीत आहे. त्यांनी काय म्हणावे, त्यांनी म्हटलेले बरोबर की चूक, या संदर्भात मी काही बोलत नाही. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "...the nature of allegations of irregularities and misappropriation raised in this PIL and the issues sought to be raised by the Leader of Opposition, we are of the view that it would also be open to the Governor of Maharashtra to consider whether the Governor would like to appoint two or three members in the said Special Inquiry Committee constituted by the Government of Maharashtra under the Government Resolution dated 31st December 2012 and whether the Governor of Maharashtra would like to have any further terms added to the terms of reference of the Special Inquiry Committee."

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा होत असताना सुरुवातीला आपण सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगितले की, जे उल्लेख यावयास नको त्याची आपण काळजी घ्यावी. परंतु त्यांचा हेतूच असा आहे की, कोर्टाचे आणि राज्यपालांचे उल्लेख वारंवार आपल्या भाषणात आणावयाचे. त्यामुळे ते सारखे वाचून दाखवित आहेत. 'कोट', 'अनकोट' या पध्दतीचा जो वापर आहे तोही या प्रस्तावाला धरुन नाही. आपण त्यांना या निमित्ताने एकदा सूचना दिल्यानंतर जर पुन्हा पुन्हा त्याच पध्दतीने तोच विषय मांडणार असतील तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे आपण त्यांना त्याबाबतची स्पष्ट सूचना द्यावी.

यानंतर श्री. खंदारे ...

अशुधित प्रत / शीघ्रलेखापी नाही

उप सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, मी आपला प्रस्ताव मांडण्यासाठी परवानगी दिलेली आहे. या प्रस्तावाच्या कार्यकक्षा ठरलेल्या आहेत त्याचे आपण उल्लंघन करु नये अशी मी मघाशी आपल्याला सूचना केलेली आहे. (अडथळा) कार्यकक्षांचे उल्लंघन न करता आपल्याला जे काही मांडावयाचे आहे ते आपण मांडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. एखाद्या बाबीसंबंधी कोर्टाचा अंतरिम आदेश आला असेल तर तो वाचून दाखविण्याची सदस्यांना अनुमती आहे की नाही ? (अडथळा) सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी मला भाषण लिहून द्यावे. तेच भाषण मी वाचून दाखवितो. सन्माननीय सदस्यांना स्वत:चे कौतुक करुन घ्यावयाचे आहे का, एक तर पैसे खाल्ले आणि त्याबाबत मी बोललो तर ते चालत नाही का ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते हे लर्नेड आहेत. त्यांना असे वाटते की, त्यांचे इंग्रजी फार चांगले आहे. खरोखर त्यांचे इंग्रजी फार चांगले आहे. कोर्टाची ऑर्डर आम्हालाही चांगली कळलेली आहे. कोर्टाने जे निर्देश दिले आहेत ते राज्यपालांसाठी दिले असतील तर त्याबाबत या सभागृहात चर्चा होऊ शकते काय, राज्यपालांनी काय करावे व काय करु नये याबाबत येथे चर्चा करावयाची असेल तर तसे त्यांनी आम्हाला सांगावे. Because he is reading the paper. He is showing that he is learned and can do anything. We also understand the language in which he is speaking. We can also give him reply in the same language. आज सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब सभागृहात उपस्थित असते तर असे झ ाले नसते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते वाचून दाखवित आहेत. तेच कागद आमच्याकडेही आहेत. त्याबाबत आमचे एकच म्हणणे आहे की, कोर्टाचे जे निर्देश आलेले आहेत, ते राज्यपालांसाठी आलेले आहेत. राज्यपालांसाठी निर्देश असतील तर ते पाळणार आहेत, पाळणार नाहीत, माणसे नेमणार आहेत की नाही, तेव्हा राज्यपालांच्या संदर्भातील निर्देशावर या सभागृहात आपण चर्चा करु शकतो काय ? जर चर्चा करता येत असेल तर त्यावर व्यवस्थित चर्चा करता येईल. सभापती महोदय, यासंबंधी आपणच स्पष्टपणे निर्णय द्यावा.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना यापूर्वीच सूचना केलेली आहे. (अडथळा) सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी पुन्हा विचारतो की, आपल्याला या विषयावर बोलावयाचे आहे की, वाद घालून ही चर्चा पुढे ढकलावयाची आहे ?

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय,.....

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण देणार आहात काय ?

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सभागृहात गोंधळ करुन कामकाज बंद करावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 154 नुसार माननीय राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात याबाबत कौल आणि शकधर यांच्या 'Practice and Procedure of Parliament' या संदर्भग्रंथातील (सहावी आवृत्ती,) पृ.क्र. 1099 वर पुढीलप्रमाणे म्हटलेले आहे.

"...the Governor under the Constitution would be functioning as Head of the State and would not be subject to control by anyone."

हे लक्षात घेऊन सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आक्षेपार्ह उल्लेख कार्यवृत्तातून काढून टाकला पाहिजे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, राज्याच्या प्रमुखाचा अवमान होत असेल तर ती बाब कार्यवृत्तातून काढून टाकण्यात यावी.

उप सभापती : आक्षेपार्ह काही बोलले गेले असेल तर ते तपासून कार्यवृत्तातून वगळण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : मी एखादी गोष्ट वाचून दाखविली तर त्याचा अर्थ मी त्यावर चर्चा केली किंवा माझे मत मांडले असा होत नाही. हे जर यांना कळत नसेल तर ते दुर्दैव आहे. आपण यांना कडक शब्दात सांगितले पाहिजे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उप सभापती : मी सभागृहाची बैठक दीड वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.57 वाजता 1.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.31 ते 02.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. ही चर्चा होऊ नये असा प्रयत्न चालला आहे का अशी माननीय सदस्यांच्या मनामध्ये शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे आपण लवकर निर्णय द्यावा अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या वक्तव्याबाबत माझी हरकत आहे. चर्चा होऊ नये असे कोणाचे मत नाही. चर्चा ही योग्य पध्दतीने आणि नियमानुसार व्हावी. नियमाच्या पलिकडे चर्चा होऊ नये.

श्री.जयंत प्र.पाटील : या सभागृहाचे कामकाज हे नियमाच्या बाहेर चालते का?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला हे कळून आले नाही की, सभागृहाची बैठक तहकूब का केली जात आहे? न्यायालयाचा काय संबंध हे मला अजून कळले नाही. परवा या सभागृहामध्ये मंत्री महोदय उत्तर देत होते, त्या उत्तरामध्ये असे नमूद केले होते की, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मी उठून उभा राहिलो आणि ही बाब निदर्शनास आणून दिली. मंत्री महोदयांना मी विचारले की, हे बरोबर आहे का? त्यांनी 'होय' म्हटले. त्यावेळी चर्चा थांबविण्यात आली नाही. सुमारे 15 मिनिटे चर्चा सुरु राहिली. मंत्री महोदयांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे सांगूनही ती चर्चा पुढे सुरु ठेवली गेली. सभापती स्थानावर कोण आसनस्थ आहे, कायदेशीर निर्णय ते देतील काय याची मला माहिती नाही. परंतु न्यायालयात एखादे प्रकरण दाखल झाले आहे म्हणून चर्चा करायची नाही असा हरकतीचा मुद्दा मांडण्यात आला असेल तर माझ्याकडे सहकार कायद्यातील दुरुस्तीच्या संदर्भात काल सभागृहात सादर केलेल्या निवेदनाची प्रत उपलब्ध आहे. हे निवेदन कोणत्या अधिकारात करण्यास अनुमती दिली गेली? या संदर्भात देखील निर्णय द्यावा लागेल.

सभापती महोदय, 97 व्या घटना दुरुस्तीच्या संदर्भात गुजरात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत आपण पार्लमेंटला मान दिला आहे. घटना तेथे निर्माण झाली. त्या अंतर्गत या सभागृहात कामकाज केले जाते. घटनेच्या बाहेर जाऊन कामकाज करण्याचा आपल्याला अधिकार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नाही आणि आम्हालाही अधिकार नाही. घटनेची बूज राखूनच प्रत्येक गोष्ट करावी लागते. गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ती बाब न्यायप्रविष्ठ झालेली आहे. विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या चर्चेबाबत केवळ बाब न्यायप्रविष्ठ आहे म्हणून कोणी हरकत घेतली असेल तर तो त्यांचा अधिकार आहे. परंतु या सदनामध्ये अशा पध्दतीने बाबीप्रमाणे, सोयीप्रमाणे फूटपट्टया बदलणार असतील, माननीय सभापतीच्या आसनावरुन असा प्रकार घडणार असेल तर ते अत्यंत गंभीर आहे.

सभापती महोदय, काल सभागृहामध्ये जे निवेदन सादर केले गेले त्याबद्दल आम्ही काही भाष्य केले नाही, निवेदन करु दिले. ही बाब न्यायप्रविष्ठ आहे. त्या प्रकरणात केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. व्यक्तिगत कोणी गेलेले नाही. राज्य सरकारांच्या बाबतीत झालेल्या निर्णयाच्या संदर्भातील कायद्याबद्दल गुजरात उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आहे त्या विरोधात केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. ही बाब न्यायप्रविष्ठ असताना निवेदन का करु दिले? न्यायप्रविष्ठ बाबीमध्ये न्यायालयाने स्थगितीचा निर्णय दिला असेल.....(अडथळा).....हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. मागील गुरुवारी विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला आला नाही म्हणून आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना व इतर महत्वाचे विषय बाजूला ठेवून सिंचनाविषयीचा राज्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेला प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला. या प्रस्तावावर चर्चा घडू नये अशा प्रकारची परिस्थिती सभागृहात निर्माण होत असेल तर माझी आपल्याला विनंती आहे, या बाबतीत खाली कोणी कायदेतज्ज्ञ बसले असतील त्यांच्याशी विचारविनिमय करुन आम्हाला या संदर्भात निर्णय देण्यात यावा.

नंतर

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या सदनामध्ये काल सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आदिवासीच्या संदर्भात जे काही मुद्दे मांडले होते ते सर्व विषय न्यायप्रविष्ठ होते. न्यायालयात बाब आहे म्हणून या सभागृहात आपण चर्चा करु शकत नाही काय ? न्यायालय सर्वोच्च आहे काय ? विधिमंडळ बंद करावयाचे आहे काय ? आता ज्या काही घटना घडत आहेत त्या फार गंभीर आहेत. विधिमंडळाला टाळे लावण्याची प्रवृत्ती आपण स्वत:च निर्माण करीत असू, स्वत:चा खड्डा स्वत:च खणत असू तर ती गंभीर बाब आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधिमंडळाला टाळे लावण्याची भाषा या सभागृहात होत असेल तर तर ते योग्य होणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी जे काही म्हणालो त्याचा आपण संदर्भ समजून घ्या. विधिमंडळाला टाळे लावण्याची परिस्थिती निर्माण करणार आहोत काय असे मी म्हणालो होतो. विधिमंडळाला टाळे लाऊ नये असे मला म्हणायचे आहे. आपल्या सारख्या सन्माननीय सदस्यांना हे समजत नसेल तर ते कठीण आहे. राखून बिखून ठेवले आहे ते काही बरोबर नाही. आजचे संपूर्ण कामकाज पूर्ण झाले पाहिजे. सेंट्रल हॉलमध्ये जो काही कार्यक्रम आयोजित केलेला आहे त्याची माहिती आम्हाला आपण नंतर द्या परंतु आजचे सभागृहाचे सर्व कामकाज पूर्ण झाले पाहिजे. सेंट्रल हॉलमध्ये कार्यक्रम असल्यामुळे 3 वाजेपर्यंत हे असेच चालू ठेवणार आहात असे आम्हाला आता वाटू लागले आहे.आपण उद्या सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव आहे. असेच जर सुरु राहणार असेल तर या सदनामध्ये कामकाजच करावयाचे नाही काय ?

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी 97 व्या घटनेच्या संदर्भाचा येथे उल्लेख केलेला आहे. 97 व्या घटनेच्या संदर्भात ए.जी. यांच्याकडून लेखी आल्यानंतरच या सभागृहात आणि जेपीसीमध्ये चर्चा झालेली आहे. मला वाटते की, यासंदर्भातील प्रोसिडींगचे काम सुरु आहे. प्रोसिडींग सुरु असतांना त्यासंदर्भात सभागृहात चर्चा होणे गैर आहे. 97 व्या घटना दुरुस्तीच्या संदर्भात ए.जी. यांनी लेखी दिलेले असल्यामुळेच आपण पुढे गेलेलो आहोत. 97 वी घटना दुरुस्ती बाजूला ठेवून बाकीचे प्रोसिडींग पुढे गेलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो काही दाखला दिलेला आहे तो चुकीचा आहे असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब हे सभागृहाचे ज्येष्ठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

सन्माननीय सदस्य असून त्यांनी असा उल्लेख केलेला आहे की, "सभागृहाचे कामकाज चालू न देता काळिमा लावण्याचा प्रकार आहे" असा जो उल्लेख त्यांनी केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी माझी विनंती आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की, सभागृहात चर्चा सुरु रहावी परंतु ती कायद्याच्या चौकटीत बसूनच सुरु रहावी एवढीच आमची अपेक्षा आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा होऊ नये असा आक्षेप आम्ही कधीही घेतलेला नाही. उलट या प्रस्तावावर चर्चा व्हावी या मताचे आम्ही सुध्दा आहोत. परंतु माननीय सभापती महोदयांनी ज्या पध्दतीचे निर्देश दिलेले आहेत त्या पध्दतीने चर्चा व्हावी अशी आमची मागणी आहे. सन्माननीय ज्येष्ठ नेते,ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले आहे की, "माननीय सभापतींच्या आसनाकडून सुध्दा अशा प्रकारचे व्हावे" असे जे शब्द उच्चारले आहे ते कामकाजातून वगळण्यात यावे अशी विनंती आहे. कारण तो माननीय सभापती महोदयांचा अधिकार आहे. माननीय सभापती महोदयांनी काय निर्देश द्यावे ते त्यांचे अधिकार आहेत.

सभापती महोदय, माझी दुसरी महत्वाची सूचना अशी आहे की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी बोलत असतांना, माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिलेले असतांना सुध्दा कोर्टाचे काही पेपर्स येथे त्यांनी वाचून दाखवले ते सर्व कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी माझा सन्मानाने उल्लेख केल्याबद्दल धन्यवाद. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी जो उल्लेख केलेला आहे तो बरोबर केलेला आहे. सॉलिसिटर जनरल यांनी म्हटले आहे की, "It is not a sub-judice matter so you can continue." सर्वोच्च न्यायालयात एखादे प्रकरण तहकूब असले तरी तुम्हाला चर्चा करण्यास हरकत नाही. असा त्याचा अर्थ आहे.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी): सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 15 मिनिटांपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.24 ते 3.15 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : म.वि.प.नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केला. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले मुद्दे मांडत असताना काही न्यायप्रविष्ट बाबीचा उल्लेख केला आहे. त्याला सत्तारूढ बाजूकडील काही माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला आहे. यासंबंधी कायदेशीर सल्ला घेण्याचा दृष्टीने काही काळ सदनाचे काम तहकूब केले होते. या मुद्यावर मी अद्याप पूर्णपणे विचार केलेला नाही. म्हणून मला असे वाटते की,

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर त्यावर भाष्य करणे योग्य नसल्यामुळे मी आपल्या अनुमतीने बोलण्यास उभा राहिलेलो आहे. मी एवढेच स्पष्ट करू इच्छितो की, न्यायालयाने निदेश दिले आहेत, अंतरिम आदेश आहेत, हे पब्लिक डॉक्युमेंट आहे. यासंबंधी मी हायकोर्टच्या रजिस्ट्रारशी चर्चा केली आहे. मी त्यांना विचारले आहे की, हे कोट करायला हरकत आहे काय ? ते म्हणाले की, "It is a public document on internet. It is for public use." माझ या बोलण्यातून मी न्यायालयाच्या प्रोसिडींगवर कुठल्याही प्रकारचे वक्तव्य करीत नाही. येथे माननीय राज्यपालांच्या निदेशासंबंधी चर्चा करण्याचा मुद्दाच येत नाही. माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशासंबंधी देखील मी काहीही म्हटलेले नाही. माननीय उच्च न्यायालयाने माननीय राज्यपालांना अधिकार देण्याविषयी विनंतीवजा जे म्हटले आहे तेच त्यामध्ये आहे. मी त्या जजमेंटवर, डायरेक्टीव्हजवर,माननीय राज्यपालांच्या कामकाजावर कुठेही माझे मत व्यक्त केलेले नाही. कोट अन कोट एकही शब्द इकडचा तिकडे केलेला नाही. हे मी एवढ्यासाठी सांगू इच्छितो की, उद्या असे वाटायला नको की, मी कोर्टाच्या निर्णयावर बोललो आहे. तसे नाही. मी माननीय राज्यपालांच्या निदेशावर बोललो आहे का ? तर नाही. आम्ही हा प्रस्ताव देत असताना चितळे समितीला इन्क्वायरी ऑफ कमिशन ॲक्ट खाली अधिकार दिले पाहिजेत किंवा 2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

टर्म्स ऑफ रेफरन्स वाढविले पाहिजेत अशा प्रकारचा आग्रह धरत आहोत. तो माननीय मुख्यमंत्र्यांनी आमच्याशी बोलताना मान्य देखील केला होता. तो या इंटरिम ऑर्डरच्या डायरेक्टीव्हजमुळे सबस्टॅन्शीएट झाला आहे. हे आम्ही फक्त कोट अन कोटमध्ये म्हणतो आहोत. बाकी त्यात काहीही म्हणत नाही. एवढेच मला येथे नमूद करावयाचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशीच्या सत्रात सुरुवातीला ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्याच गोष्टी पुन्हा सांगण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता या विषयी पीठासीन अधिकारी या नात्याने आपण अद्याप मत देणे बाकी आहे. त्यामुळे नेमका तेवढा विषय सोडून माननीय विरोधी पक्ष नेत्यांना या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करता आली असती. परंतु ते पुन्हा पुन्हा पूर्वीचाच विषय काढून तो विषय सभागृहाच्या पटलावर कसा येईल यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांची ही वृत्ती बरोबर नाही. आमची या प्रस्तावावर चर्चा करण्याची तयारी आहे. माननीय विरोधी पक्ष नेते या प्रस्तावावरील चर्चेस ज्या वेळी सुरुवात करतात त्या वेळी या बाबत उल्लेख करण्याची गरज नसताना सुध्दा तोच तोच उल्लेख करुन वाद वाढवित आहेत. या बाबत आपण त्यांना सूचना द्याव्यात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या पूर्वी मी बोलत असताना सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली. महोदय, आम्ही या प्रस्तावाच्या अनुषंगाने बोलायला काय मागत आहोत ? न्यायालयाने जे आदेश दिले आहेत त्याचे पालन जिल्हाधिकारी व राज्य सरकार करीत नाहीत, या बाबत आम्ही बोलत आहोत. महोदय, न्यायालयाने म्हटले आहे की, "तटकरे यांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करा", "तटकरेंच्या चौकशीचा अहवाल 14 ऑगस्टपर्यंत द्या", "तटकरेंचा तपास करीत असताना...."

(सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मांडलेल्या मुद्याचा नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाशी दुरान्वयेही संबंध नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, आपण जे बोलता तेच कायद्याने खरे आहे असे मानण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील जे सांगत आहेत त्याला माझी हरकत आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावामध्ये जो उल्लेख केलेला आहे त्या बाबत माननीय सभापतींनी निर्णय द्यावा. या प्रस्तावावरील चर्चेस आमची तयारी आहे. या पूर्वी सिंचनाच्या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. राज्यात सिंचन 0.1 टक्क्याने वाढले की 0.5 टक्क्याने वाढले या बाबत देखील चर्चा झाली आहे. कोणत्याही विषयावरील चर्चेस आमची नेहमीच तयारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

सभापती महोदय, न्यायालयीन चौकटीच्या अधीन राहून चर्चा कशी घडवून आणावी हा आपला अधिकार आहे. आपण या बाबत योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मांडलेला मुद्दा इतिवृत्तातून काढून टाकावा अशी माझी ठाम मागणी आहे.

श्री.किरण पावसकर : महोदय, न्यायालयाने राज्य सरकारला निदेश दिले नसून माननीय राज्यपालांना सदस्य संख्या वाढविण्याबाबत सूचना केली आहे. उच्च न्यायालयाने राज्याचे प्रमुख या नात्याने माननीय राज्यपालांना सूचना केली असेल तर त्या संदर्भातील चर्चा सभागृहात करावी की करु नये, या बाबत आपल्याकडे विचारणा केलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्य दिशाभूल करीत आहेत, ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, न्यायालयाने रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिला आहे. त्यावेळी मी स्वत: न्यायालयात उपस्थित होतो. त्या वेळी माननीय मंत्री उपस्थित नव्हते. प्रत्येक तारखेला आम्ही न्यायालयात जातो. माननीय उच्च न्यायालयाने जे वक्तव्य केलेले आहे त्याचे गांभीर्यच आपण लक्षात घेत नाही. कारण या ठिकाणी त्या बाबीवर चर्चाच होत नाही.

श्री.सुनील तटकरे : महोदय, माझी विनंती आहे की, मी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे त्यावर आपण निर्णय द्यावा.

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना त्यांचे म्हणणे पूर्ण करु द्यावे.

सभापती : मी, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यांचे बोलणे झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना बोलण्यास संधी देण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : महोदय, सुरुवातीला या विषयी आक्षेप घेतल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी निदर्शनास आणून दिले की, चार दिवसांपूर्वी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आला होता त्या संदर्भात आपल्याकडे बैठक झाल्यानंतर सुधारित प्रस्ताव देण्यात आला.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शोधनाधीन मसुदा

श्री. सुनील तटकरे ....

त्यानंतर माननीय उप सभापती महोदय आसनस्थ होते आणि त्यांनी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना प्रस्ताव मांडण्यासाठी मान्यता दिली. त्यांनी प्रस्ताव मांडण्यास मान्यता दिल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उच्च न्यायालयात जी पिटीशन आहे त्या संदर्भात उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील जे म्हणतात ते वेगळे आणि आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो उल्लेख केला ते वेगळे आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय उच्च न्यायालयामध्ये जे घडले ते या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केला. त्याला सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला आणि त्यावरुन सभागृह तहकूब झाले.

माननीय सभापती महोदय, त्यानंतर आता सभागृह सुरु झाल्यानंतर आपण असे सांगितले की, त्या बद्दलच्या निर्णयाप्रत आपण अजून आलेला नाही. याचा अर्थ असा आहे की, ज्या कारणासाठी सभागृह तहकूब झाले त्या संदर्भात जोपर्यंत आपण निर्णयाप्रत येत नाही तोपर्यंत सभागृह सुरु करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे आता या ठिकाणी जे मांडले गेले तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो याच्याशी जराही संबंधित नाही. न्यायालयाच्या बाबतीत जे काही असेल त्या संदर्भात प्रत्येकाची सामोरे जाण्याची तयारी आहे. त्या संदर्भात कोणाबद्दल जराही संदेह असण्याचे कारण नाही. ते संदर्भ वारंवार या ठिकाणी देऊन, त्याचा आधार घेऊन त्या संदर्भात जे काही बोलले जाते ते गैर आहे. ते कामकाजातून काढून टाकावे अशी माझी पुन्हा एकदा आपल्याला विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना त्यांचे म्हणणे पूर्ण करु द्यावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर माझी सही आहे. या प्रस्तावामध्ये असे म्हटले आहे की, "...समिती अध्यक्ष श्री. चितळे यांनी समितीला तसा अधिकार नसल्याचे प्रतिपादन करणे, ही बाब लक्षात घेऊन सिंचनातील भ्रष्टाचार बाहेर पडण्यासाठी श्री. चितळे यांनी सर्व प्रकारच्या तक्रारींची चौकशी करण्याची मागणी तसेच तसेच एस.आय.टी. ची कार्यकक्षा बदलण्याची मागणी सभागृहात करणे, परंतु शासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, शासनाकडून याबाबत सकारात्मक प्रतिसाद न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. जयंत प्र. पाटील .....

मिळाल्याने सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत शासनाच्या भूमिकेबाबत कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी एस.आय.टी. च्या कार्यकक्षेत व रचनेत बदल करण्याची आवश्यकता, विचारात घेण्यात यावी." त्यामुळे नियम 260 अन्वयेच्या या प्रस्तावामध्ये सर्व प्रकारची चर्चा येते. यामध्ये सर्व चर्चा करु शकतो. या प्रस्तावामध्ये आणखी काय म्हणावयास पाहिजे ?

सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये आपण अर्ध्यापेक्षा जास्त आयुष्य घालविले आहे. असे प्रस्ताव अनेक वेळा आलेले आहेत. आमच्यावर अन्याय होऊ नये, आपण आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी मी या ठिकाणी करतो. मी कोर्टाबाबत आक्षेपार्ह किंवा कोर्टाच्या बाबतीत आक्षेप होईल असे कोणतेही वक्तव्य करीत नाही. म्हणून या प्रस्तावावरील चर्चा सुरु व्हावी अशी मागणी करतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रस्तावावर जी बाजू मांडली त्याचे मी समर्थन करीत आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील या ठिकाणी वारंवार कोर्टाचे काही तरी निर्णय आणि पेपर्स वाचून दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोर्टामध्ये काय चर्चा झाली हे वाचून दाखविण्यासाठी हे सभागृह आहे का ? हे सार्वभौम सभागृह आहे. आपल्याला जर या ठिकाणी वारंवार कोर्टाचे विषय मांडावयाचे असतील तर त्यासाठी आपण कोर्टात जावे. सभापती महोदय, सर्वांच्या बाबतीत कोर्टामध्ये काय चालले आहे त्याबाबत सर्वांचे पेपर्स सभागृहाच्या पटलावर सादर करावेत. आम्हीही सर्वांच्या बाबतीत चर्चा करतो. या ठिकाणी सिंचनाचा महत्वाचा विषय आहे. महाराष्ट्रातील आमच्या दुष्काळी भागातील जनता काही तरी चांगले निघेल यासाठी इकडे कान लावून बसलेली आहे. यांना फक्त राजकारण करावयाचे आहे, आरोप करावयाचे आहेत. सभापती महोदय, याबाबत आपण निर्देश द्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना सांगू इच्छितो की, या सदनामध्ये प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार आहे. त्यांनी कोणते विचार मांडावेत हा त्यांचा हक्क आहे. एखादा अयोग्य विचार असेल तर तो दुरुस्त कसा करता येईल या दृष्टीने त्याकडे आपण पाहात असतो. मी निर्णयाप्रत येण्याच्या अगोदर एवढेच सांगू इच्छितो की, प्रथम ज्या दिवशी नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्यात आला ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझा मुद्दा मांडण्यापूर्वी माझी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना एक विनंती आहे. या सदनामध्ये जे कामकाज चालते त्यामध्ये विरोधी पक्षाचा आक्षेप हा सरकारच्या संदर्भात असतो. तो आक्षेप व्यक्ती म्हणून नसतो. व्यक्ती म्हणून आम्ही एखादी गोष्ट बोलावयास गेलो तर ते वेगळे असते. पण सरकार म्हणून उद्या आम्ही त्या ठिकाणी असलो आणि आपण या ठिकाणी असला तरी तेच करणार. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे जेव्हा या सभागृहामध्ये उपस्थित असतात तेव्हा ते या सभागृहाचे नेते आणि उप मुख्यमंत्री असतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माननीय श्री.सुनील तटकरे हे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत आणि सिंचन विभागाचे प्रमुखही आहेत. त्यामुळे या चर्चेला त्यांनाच उत्तर द्यावयाचे आहे. त्यांच्यावर हे उत्तरदायित्व आहे. या सभागृहाला ज्येष्ठ सदस्यांचे सभागृह म्हटले जाते. या सभागृहात आपण हमरीतुमरीवर येऊ. परंतु केवळ ते आपल्या पक्षाचे मंत्री आहेत म्हणून त्यांना वाचविले पाहिजे या भूमिकेतून सन्माननीय सदस्यांनी वागू नये अशी माझी आपल्याला विनंती आहे. सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे, पण माझी याबाबत सर्वांना विनंती आहे. या सभागृहात अशी स्थिती निर्माण झालेली आहे, कदाचित तो माझा गैरसमज असेल. एकदम सर्वांनी उभे राहून बोलावयाचे हे योग्य नाही. सत्तारुढ पक्षाकडून सभागृहाचे कामकाज कधीही बंद पाडले जात नाही.

श्री.रमेश शेंडगे : सत्तारुढ पक्षाने एकदाही सभागृहाचे कामकाज बंद पाडले नाही. आम्ही या प्रस्तावावर चर्चा करावी असे म्हणत होतो.

श्री.दिवाकर रावते : तीन वेळा सभागृहाचे कामकाज बंद पाडले आहे. (अडथळा)

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आता असे म्हटले की, सत्तारुढ पक्षाकडून सभागृहाचे कामकाज बंद पाडले जात नाही. (अडथळा) सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मला माझे म्हणणे मांडू द्यावे. सन्माननीय सदस्य सभागृह बंद पडण्याबाबत जे वक्तव्य करीत आहेत ते चुकीचे आहे. या प्रस्तावावर चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. ही चर्चा कायद्याच्या चौकटीत बसून व्हावी. माननीय विरोधी पक्ष नेते या प्रस्तावरील चर्चा करीत असताना ती वेगळ्या दिशेने नेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. ते चुकीचे आहे हे, मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी मला सल्ला दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी नेहमी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे नाव घेत असतो. त्याचे कारण असे की, ते तुम्हाला मार्गदर्शन करु शकतील. सभापती महोदय, या सभागृहात कायदे तयार होतात आणि त्या कायद्याप्रमाणे जनतेने वागावे अशी सभागृहाची भावना असते. त्याचबरोबर घटनेच्या अंतर्गत या ठिकाणी काम करावे अशी घटनेची अपेक्षा आहे. म्हणून आपण शपथ घेत असताना घटनेला स्मरुन शपथ घेत असतो. शपथ घेत असताना घटनेप्रमाणे मी या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते.....

सदनात काम करीन असे म्हणतो. कायद्याप्रमाणे काम करावयाचे असते. बाहेर कोणाला तरी मारहाण झाली तर कायदा हातात घेतला असे म्हणत असतो. त्याला आपण कायदा म्हणतो. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर असे म्हणाले की, राज्याच्या प्रमुखांविषयी या सभागृहात बोलावयाचे नाही. (अडथळा)

आज सभागृहात सकाळपासून जे सुरु आहे त्याबाबत मी मघाशी आपल्याकडेही मुद्दा मांडला आहे. राज्यपाल महोदयांना न्यायालयाने जे सांगितले आहे ते माननीय विरोधी पक्ष नेते कोट करीत आहेत. या प्रस्तावामध्ये राज्यपालांसंबंधी जो मुख्य शब्द घातला होता तो का काढला ते मला समजले नाही. खरे तर या सदनामध्ये आपण राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करतो. देशामध्ये केवळ या राज्यात घटनेचे 371 (2) कलम अस्तित्वात आहे. राज्यपाल मंत्रिमंडळाला नाही तर या सदनाला थेट निर्देश देतात. अर्थसंकल्पातील निधी समन्यायी तत्वावर वाटप करण्याची जबाबदारी राज्यपालांवर असल्यामुळे राज्याचा अर्थसंकल्प त्यांच्याकडे पाठविल्याशिवाय तो येथे मांडता येत नाही. राज्यपालांचा सभागृहाच्या कामकाजाशी थेट संबंध आहे. फक्त राज्यपालांचा योग्य सन्मान ठेवून टीका करताना त्यातील गांभीर्य ओळखून खेद व्यक्त करता येतो. या राज्याचे ते प्रमुख आहेत इतक्या जबाबदारीचे राज्यपाल पद आहे ते सांभाळावे लागते. घटनेच्या कलम 371(2) मध्ये जी तरतूद असेल त्या अनुषंगानेच बोलावे लागेल. न्यायालयाने आपल्या मंत्रालयाला आदेश दिले पाहिजे होते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यांनी मुख्यमंत्र्यांना आदेश दिले पाहिजे होते, मंत्रिमंडळाला आदेश दिले पाहिजे होते. परंतु न्यायालयाने माननीय राज्यपालांना आदेश दिले. हे आदेश त्यांना का दिले ? कारण घटनेच्या अनुच्छेद 371(2) प्रमाणे या महाराष्ट्रामध्ये समन्यायी वाटपाचे अधिकार माननीय राज्यपालांना आहेत. या सदनामध्ये माननीय राज्यपालांच्या संदर्भात त्यांच्या पदाचा योग्य तो आब आणि मान राखून या संदर्भात नकारात्मक किंवा कोणत्याही प्रकारचे वादातीत विधान न होता प्रत्येक सदस्याला या सदनामध्ये आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. म्हणून याबाबतीत आपणाला येथे चर्चा करता येते असे माझे मत आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दिनांक 18.7.2013 रोजी या सदनाच्या कामकाजपत्रिकेमध्ये आल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते यांची आणि माझी त्याबाबतीत चर्चा झाली. त्या प्रस्तावाच्या आशयामध्ये जो आक्षेपार्ह असा आशय होता तो आशय वगळून आपण प्रस्ताव द्यावा अशी मी त्यांना सूचना केली आणि त्यांनी ती मोठ्या मनाने मान्य केली. त्यानंतर दुसरा प्रस्ताव आपल्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आला. आज या सभागृहामध्ये चर्चा करताना आधीच्या प्रस्तावामध्ये जी आक्षेपार्ह बाब होती ती या सदनामध्ये येऊ नये अशी माझी अपेक्षा होती. तरीही सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्तावावर आपले विचार मांडत असताना न्यायप्रविष्ट असलेली बाब आणि कोर्टामध्ये ऑगस्टमध्ये हिअरिंगसाठी येणारी बाब या दोन बाबींचा येथे उल्लेख करणे बरोबर नाही असे माझे मत होते.

माननीय राज्यपाल ही घटनादत्त अशी संस्था आहे. त्यानुषंगाने सदनाच्या कामकाजामध्ये त्यांचा कधीच उल्लेख केला जात नाही म्हणून तो टाळावा अशी सदनाची अपेक्षा होती. त्याबाबतीत दोन्ही बाजूकडून चर्चा झाली. असा उल्लेख करण्यामध्ये काही गैर आहे असे वाटत नाही असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे मत होते. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी माझे लक्ष याकडे वेधले की, अशा पध्दतीची चर्चा ही गैर चर्चा आहे आणि त्यादृष्टीने ही चर्चा करताना दोन बाबी चर्चेत येता कामा नयेत. याबाबत मी कायदेशीर सल्लागारांबरोबर बोललो, त्यांच्याशी चर्चा केली. संसदीय कार्य विभागाच्या सचिवांबरोबर बोललो. माझी ही चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. यासंबंधीचा निर्णय मी उद्या सकाळी सभागृह सुरु झाल्यानंतर जरुर देईन. या संदर्भातील निर्णय मी दिलेला नसून तो तहकूब ठेवलेला आहे. नियम 260 अन्वयेचा हा प्रस्ताव कधी घ्यावा याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

निर्णय मी उद्या सकाळी घेईन. त्यामुळे मी आता सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याचा निर्णय घेत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 25 जुलै 2013 रोजी सकाळी 10 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00ते दुपारी 12.00 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 39 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 25 जुलै 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही